रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २४३
www.ramprahar.com

शुक्रवार, २१ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

### पुढील वर्षी भारत नक्षलमुक्त होणार -ना. अमित शाह



**गडचिरोली :** केंद्र सरकारच्या नक्षलवादविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. गुरुवारी (२० मार्च) छत्तीसगडच्या विजापूर-दंतेवाडा सीमेवर सुरक्षा दलांनी ३० नक्षलवाद्यांचा खात्मा केला. चकमकीत एक जवानही शहीद झाला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी या मोहिमेबद्दल माहिती दिली आणि ३१ मार्च २०२६ पूर्वी देश नक्षलमुक्त होईल, असा विश्वासही व्यक्त केला. दरम्यान, यावर्षी छत्तीसगडमध्ये मोठ्या प्रमाणात नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे. आतापर्यंत छत्तीसगडमध्ये ७१ नक्षलवादी ठार झाले आहेत. या कारवाईनंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले आहे की, आज आपल्या जवानांनी 'नक्षलमुक्त भारत अभियाना'च्या दिशेने आणखी एक मोठे यश मिळवले आहे. भारत देश पुढील वर्षी ३१ मार्चपूर्वी नक्षलमुक्त होईल, अशी प्रतिक्रिया ना. अमित शाहांनी दिली.

अंतरंग

शिक्षणाला एआयपूरकच ठरेल -मंत्री आशिष शेलार/२

रायगड प्राधिकरणचा निधी योग्य कामासाठी वापरा -दरेकर/५

मुंबईपाठोपाठ राजस्थान रॉयल्सनेही कर्णधार बदलला/८

# भारतीय लष्कराची ताकद वाढणार!

## केंद्राची सात हजार कोटींच्या स्वदेशी तोफ खरेदीला मंजुरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील सुरक्षाविषयक कॅबिनेट समितीने (सीसीएस) सात हजार कोटी रुपयांच्या संरक्षण करारास मंजुरी दिली. या करारांतर्गत डव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम खरेदी केली जाणार आहे.

विशेष म्हणजे ही भारतातच डिझाइन आणि विकसित केलेली पहिली स्वदेशी आर्टिलरी गन आहे. सरकारच्या मते, हा करार आर्टिलरी गन उत्पादनात आत्मनिर्भरतेच्या दिशेने उचललेले मोठे पाऊल आहे. १५५ मिमी लांबीच्या या अत्याधुनिक तोफांमुळे भारतीय सशस्त्र दलांच्या क्षमतेत लक्षणीय वाढ होणार आहे.

ॲडव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम प्रणालीमध्ये ५२-कॅलिबरची लांब तोफ आहे, जी ४० किमीपर्यंत मारा करण्यास सक्षम आहे. या प्रणालीमुळे उच्च मारकता प्राप्त होते आणि मोठ्या प्रमाणात स्फोटक भार वाहून नेण्याची क्षमता मिळते. शिवाय, स्वयंचलित तैनाती, लक्ष्य भेदण्याची क्षमता आणि कमी क्रू यामुळे ही प्रणाली अधिक प्रभावी ठरते. ॲडव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम प्रणाली संरक्षण संशोधन व विकास संस्था आणि भारतीय खासगी क्षेत्रातील भागीदारांनी संयुक्तपणे विकसित केली आहे. यातील ६५ टक्केहून अधिक भाग भारतातच तयार



केले जातात. यामध्ये बॅरल, मझल ब्रेक, ब्रीच मेकॅनिझम, फायरिंग व रेकॉइल सिस्टीम आणि दारुगोळा हाताळणी यंत्रणा यांचा समावेश आहे. या प्रकल्पामुळे भारताच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राला मोठी चालना मिळेल आणि परदेशी उपकरणांवरील अवलंबित्व कमी होईल.

ॲडव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम प्रणालीमुळे भारतीय लष्कराच्या जुन्या १०५ मिमी आणि १३० मिमी तोफा बदलण्यास मदत होईल. विशेषतः पश्चिम आणि उत्तरी सीमेवर या तोफा तैनात केल्याने लष्कराला सामरिक फायदा मिळेल आणि युद्धसज्जता वाढेल. पूर्णतः स्वदेशी असलेल्या या प्रणालीला दीर्घकालीन तांत्रिक सहाय्य मिळेल आणि सुटे भाग सहज उपलब्ध होतील. यामुळे भारतीय संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्णता वाढेल. डव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम साठी नेव्हिगेशन सिस्टम, मझल वेग रडार आणि सेन्सर्ससारख्या महत्त्वाच्या प्रणालीदेखील भारतातच विकसित करण्यात आल्या आहेत, त्यामुळे परदेशी तंत्रज्ञानावर अवलंबित्व मोठ्या प्रमाणात कमी होईल.

ॲडव्हान्स्ड टोइड आर्टिलरी गन सिस्टम निर्मितीमुळे सुमारे २० लाख रोजगार निर्माण होईल. तसेच, या योजनेमुळे भारताच्या संरक्षण निर्यातीत वाढ होण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे देशाला जागतिक संरक्षण बाजारपेठेत आपली क्षमता सिद्ध करता येईल.

# निविदा प्रक्रियेतच स्वामित्वधन आकारणार -महसूलमंत्री

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सूचनेनुसार शासनाने घेतला निर्णय

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

विकासकामांचे अंदाजपत्रक व त्या अनुषंगाने तयार करण्यात येणाऱ्या निविदा प्रक्रियेत स्वामित्वधनाची तरतूद अंतर्भूत करण्यात येईल आणि तशाप्रकारचा शासन निर्णय लवकरच निर्गमित करण्याचे आश्वासन राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. विकासकामातील स्वामित्वधनाच्या दृष्टिकोनातून अनेक अडचणींना शासनाला सामोरे जावे लागते. तसेच ठेकेदाराकडून स्वामित्वधन बुडवल्या जाण्याच्या घटनांना आळा घालण्यासाठी आणि प्रकिया सुलभ व्हावी यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी स्वामित्वधनाची तरतूद निविदा प्रकियेमध्येच करण्याची मागणी प्रश्नोत्तराच्या अनुषंगाने केली. या वेळी नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची सूचना योग्य असल्याचे सभागृहात अधोरेखित केले.

ठाणे महापालिकेतील भुयारी गटार योजनेच्या ठेकदारांनी मातीची बेकायदेशीर वाहतूक करून स्वामित्वधन (रॉयल्टी) बुडविल्याबाबत तारांकित प्रश्न आमदार





प्रशांत ठाकूर व आमदार किसन कथोरे यांनी दाखल केला होता. या प्रश्नानुसार सभागृहात चर्चा करण्यात आली. या वेळी सभागृहात बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्यातील विविध कामाच्यासंदर्भातील स्वामित्वधनाचा विषय मांडला व त्या संदर्भात योग्य कार्यवाहीची मागणी केली. राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी नागरी किंवा ग्रामीण विभागामध्ये विविध पद्धतीची विकासकामे होत आहेत.

या विकासकामांच्या अनुषंगाने उत्खनन केले जाते आणि अर्थातच जेव्हा उत्खनन केले जाते त्यावेळी उत्खनन केलेली माती, दगड इतरत्र टाकले जाते. बऱ्याच वेळेला या संदर्भामध्ये स्वामित्वधन बुडवल्या जाण्याच्या तक्रारी सर्व स्तरावर उमटत असतात. आणि त्यामधून अनेक वेळेला वेगवेगळ्या पद्धतीने आर्थिक पद्धतीचने आर्थिक अपेक्षा प्रश्न मांडणारे माहिती अधिकारी हि सारी मंडळी करत असतात आणि त्यावेळी लक्षात येते कि वर्षानुवर्षे चौकश्या सुरू आहेत किंवा त्याच्या अनुषंगाने त्याच्या पडद्याआड अन्य काही तरी चालू आहे तसेच लिटिगेशन, न्यायालयात केसेस अशा बाबी चालू राहण्यापेक्षा महाराष्ट्र सरकारचे कुठलेही खाते असो ज्या ठिकाणी स्वामित्वधन विषय येतो तर अशा वेळेला कुठल्याही विभागाचा टेंडर असू द्या त्या टेंडरच्या अनुषंगाने जर उत्खनन करावे लागेल आणि त्याची रॉयल्टी भरावी लागेल तर त्याची स्वामित्वधनाची तरतूद त्या कामातच केली गेली पाहिजे. सिडको किंवा अन्य विभागामध्ये तशी तरतूद आहे. त्याप्रमाणे महसूल विभागाने अन्य विभागाकडे आग्रह धरावा, अशी मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सभागृहात केली.

या वेळी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर देताना सांगितले की, विकासकामांचे अंदाजपत्रक करताना जो आराखडा केला जातो त्यामध्ये माती, मुरूम, दगड, काँक्रीट, रेती, गौण खनिज आदी साहित्य किती प्रमाणात लागणार याची माहिती असते. त्या अनुषंगाने त्या अंदाजपत्रकामध्ये रॉयल्टीची रक्कम अंतर्भूत करण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेली सूचना योग्य आहे. ग्रामपंचायत ते नगरपालिका, एमएमआरडीए, पीएमआरडीए सर्वांच्या विकासकामांमध्ये स्वामित्व रक्कम धरूनच अंदाजपत्रक करा आणि स्वामित्व रक्कम वसूल करूनच देयके तयार करावीत असे आदेश सर्व विभागांना देण्यात येतील व तरतूद केली जाईल आणि त्यानुसार महसूल विभागामार्फत शासन निर्णय केला जाईल आणि मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने शासन निर्णय निर्गमित केले जाईल, असे नामदार चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात आश्वासित केले.

# राज्यातील सरकारी शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू

## शिक्षणमंत्र्यांची सभागृहात घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील राज्य शिक्षण मंडळांच्या शाळांना सीबीएसई अभ्यासक्रम लागू करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासूनच स्टेट बोर्ड शाळेतील विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात सीबीएससी पॅटर्न लागू करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ या वर्षापासून सीबीएससी पॅटर्न लागू होणार असून राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढील लागावी या हेतूने सरकारने हा निर्णय घेतला आहे.

राज्याचे शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी यासंदर्भात गुरुवारी (दि.२०) सभागृहात माहिती देत घोषणा केली. विशेष म्हणजे यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत झालेल्या बैठकीनंतरही त्यांनी राज्यात सीबीएससी पॅटर्न लागू



करण्यासंदर्भात आढावा सुरू असल्याचे म्हटले होते.

राज्य अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संदर्भात सुकाणू समितीने मान्यता दिली असून मंत्री दादा भुसे यांनी विधान परीषदेतील प्रश्नावर लेखी उत्तर देत माहिती दिली. भाजप नेते आणि आमदार प्रसाद लाड यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री दादा भुसे यांनी हे उत्तर दिले.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून मंत्रालयातील सर्वच विभागांसाठी पुढील १०० दिवसांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात आला होता. त्यानुसार शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र पुन्हा आघाडीवर येणार असा विश्वास शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत त्यांनी व्यक्त केला होता. शिक्षण विभागाने गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी पाऊले उचलावीत असे निर्देश यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिले. दरम्यान, त्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत, त्यानुसार राज्यातील शाळांमध्ये सीबीएसई पॅटर्नचा अंगीकार करून त्यात राज्याप्रमाणे आवश्यक बदल करण्यासंदर्भातही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सूचना केल्या होत्या.

## निवडक

### एचएसआरपी नवीन नंबर प्लेटला मुदतवाढ

**मुंबई :** उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी म्हणजेच एचएसआरपी (High Security Registration Number Plate) बसवण्यासाठी नवीन डेडलाईन जारी करण्यात आली आहे. आतापर्यंत अतिशय थोड्याच वाहनांना एचएसआरपी बसवून झाल्याने परिवहन आयुक्तांनी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

### नागपूरच्या अनेक भागातील संचारबंदी उठवली

**नागपूर :** येथील अनेक भागात जनजीवन सामान्य असल्याने ९ पोलीस स्टेशन हद्दीतील संचारबंदी पूर्णतः उठविण्यात आली आहे. काही भागात चार तास शिथिलता, तर हिंसाचार झालेल्या कोतवाली, गणेशपेठ, तहसील भागातील पोलीस स्टेशनमध्ये संचारबंदी जैसे थे आहे. १८ मार्च रोजी रात्री सुरू झालेली संचारबंदी २० मार्चरोजी दुपारपासून नंदनवन आणि कपिल नगर पोलीस स्टेशन येथील संचारबंदी पूर्णतः उठविण्यात आली आहे.

### चवदार तळे सत्याग्रहाचा ९८वा वर्धापन दिन उत्साहात

# महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करणार

## ना. संजय शिरसाट यांची घोषणा

**महाड : प्रतिनिधी**

समाजाला समानतेचा व समतेचा संदेश देणाऱ्या चवदार तळे सत्याग्रहाच्या साक्षीने गुरुवारी (दि.२०) राज्याचे सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करताना महाड परिसरामध्ये भीमसृष्टी सामाजिक न्याय विभागाच्या मार्फत निर्माण करण्याची घोषणा केली व यासाठी लागणारा सर्व निधी उपलब्ध करून देण्यात येईल असे जाहीर केले. लाखो अनुयायांच्या उपस्थित महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले.

दरम्यान, याचवेळी बोलताना स्थानिक आमदार व रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी चवदार तळे सुशोभीकरणासाठी यापूर्वीच घोषित झालेल्या सात कोटी रुपयांच्या तसेच राजर्षी शाहू महाराजांच्या स्मारकाच्या तीन कोटी रुपयांची कामे तातडीने सुरू केली जातील, अशी घोषणा केली.

ऐतिहासिक महाडमध्ये चवदार तळे



सत्याग्रहाचा ९८वा वर्धापन दिन लाखो भीम भक्त अनुयायांच्या उपस्थितीमध्ये सकाळपासूनच उत्साहात साजरा झाला. सकाळी साडेआठ वाजता चवदार तळे येथील डॉ. आंबेडकर स्मारकासमोर रायगड पोलीस दलातर्फे मानवंदना देण्यात आली. त्यानंतर हेलिकॉप्टरमधून चवदार तळे परिसरावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

या वेळी बोलताना नामदार संजय शिरसाट यांनी संवाद साधताना समाज कल्याण व सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांनी आपल्या विभागामार्फत भीमा कोरेगाव येथील स्मारकासाठी १०० कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती दिली. बुद्धगया येथे बिहार शासनाच्या वतीने दहा एकर जागा अधिकृत करून त्या ठिकाणी न्याय भवन बांधण्याचा मनोदय व्यक्त केला, तर राज्यात १२५ ठिकाणी वसतिगृहे निर्माण करण्यात येणार असून त्यामधून २५ हजार विद्यार्थ्यांची सोय होईल, असा विश्वास व्यक्त केला. डॉ. आंबेडकरांनी ९८ वर्षांपूर्वी केलेली क्रांती आजही भीम अनुयायांमध्ये ताजेपणाने जिवंत असल्याचे दिसून आले असून चवदार तळे येथील पाण्याच्या शुद्धीकरणासाठी फिल्टरेशन प्लांट लावण्यात येईल, असे जाहीर केले.

स्थानिक आमदार रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले यांनी सुशोभीकरणाच्या कामासाठी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात घोषित करण्यात आलेल्या सात कोटी रुपयांच्या तसेच राजर्षी शाहू महाराजांच्या तीन कोटी रुपयांच्या कामांची तातडीने सुरुवात होईल, अशी घोषणा केली. **(पान २ वर..)**

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राचा सर्वोच्च नागरी पुरस्कार असलेला २०२४ चा महाराष्ट्र भूषण पुरस्कार ज्येष्ठ



शिल्पकार राम सुतार यांना जाहीर झाला आहे, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

याबाबत दिलेल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणाले, राम सुतार हे ज्येष्ठ शिल्पकार आहेत. त्यांचे वय सध्या १०० वर्ष असून अजूनही ते शिल्प तयार करण्याचे काम करीत आहेत. इंदू मिल येथे निर्माणाधीन असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती तयार करण्याचे कामही राम सुतार करीत आहेत.

या पुरस्कार निवडीबाबत १२ मार्च २०२५ रोजी निवड समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत राम सुतार यांच्या नावाला २०२४ च्या पुरस्कारासाठी मान्यता देण्यात आली. या पुरस्कारचे स्वरूप २५ लाख रुपये, मानपत्र, मानचिन्ह व शाल असे आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

# माथेरानचा पर्यटन व्यवसाय पूर्ववत; निर्णयाची प्रतीक्षा

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरान पर्यटनस्थळ मागील दीड दिवस पूर्णतः बंद करण्यात आले होते. शासनाने पुढील आठ दिवसांत मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर दाखल होणाऱ्या पर्यटकांसाठी योग्य सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले आहे. आता याठिकाणी पर्यटकांची कोणत्याही प्रकारे फसवणूक होणार नाही असेदेखील सांगण्यात आले आहे. त्यामुळे माथेरान पर्यटनस्थळ सुरू झाले असून सर्व व्यवसाय सुरळीत सुरू झाले आहेत.

माथेरान प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाका म्हणजेच टॅक्सी स्टँड याठिकाणी पर्यटकांची होणारी फसवणूक त्यांना माथेरान पर्यटनसंबंधी मिळणारी खोटी माहिती आणि यामधून पर्यटकांची होणारी दिशाभूल याबाबत माथेरान स्थानिकांनी माथेरान पर्यटनस्थळ बंद करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. दीड दिवस बंद असलेल्या माथेरानच्या बातम्या सर्वत्र पसरल्या




होत्या त्यामुळे या ठिकाणी येणारे पर्यटक दूरध्वनीद्वारे संपर्क करून हे आपले आवडते पर्यटनस्थळ सुरू झाले की नाही, अशी विचारणा करीत होते. प्रशासनाने स्थानिक नागरिकांच्या मुख्य मागण्या मान्य केल्या असून आता पुढील आठ दिवसांत त्या पूर्ण करणार असल्याची ग्वाही बैठकीत दिली आहे. त्यामुळे माथेरान पर्यटनस्थळ सुरळीत सुरू झाले असून पर्यटक येण्यास सुरुवात झाली आहे. येथील सर्व लॉज हॉटेल्स यांच्या ऑनलाईन बुकिंगसुद्धा नियमित सुरू झाल्या आहेत. शेकडो पर्यटक माथेरानमध्ये दाखलदेखील झाले आहेत.

*आम्ही दोन दिवसांसाठी माथेरानला येण्याचा प्लॅन करीत होतो, मात्र माथेरान बंद असल्याची माहिती येथे मिळत होती. त्यामुळे आम्ही फोनद्वारे माहिती घेतली तर माथेरान सुरळीत सुरू झाले आहे असे समजले. त्यामुळे आम्ही सहकुटुंब माथेरानला आलो आहोत. सर्व व्यवस्थितपणे सुरू आहे.*

*-**भाऊसाहेब अहिरे,** पर्यटक, मुंबई*

*माथेरान पर्यटनस्थळी पर्यटकांच्या सोयी सुविधांसाठी मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यावर होत असलेल्या फसवणुकीसाठी माथेरान बंद केले होते. प्रशासनाने आमच्या मागण्या मान्य केल्या असून थंड हवेचे पर्यटनस्थळ सुरळीत सुरू झाले आहे. येथील सर्व लॉजधारक, हॉटेल व्यावसायिक पर्यटकांच्या सेवा सुविधा पुरविण्यासाठी सज्ज झालेले आहेत.*

*-**निखिल शिंदे,** लॉज व्यावसायिक*

## रायगडावर गेलेल्या भीमसैनिकाचा मृत्यू

**महाड : प्रतिनिधी**

चवदार तळे येथील कार्यक्रमासाठी आलेल्या पुणे येथील एका भीमसैनिकांचा रायगड येथे खुबलढा बुरुजवरून पडून मृत्यू झाल्याची घटना गुरुवारी (दि.२०) संध्याकाळी पाच वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

चवदार तळे सत्याग्रह कार्यक्रमासाठी आलेले भीमराव अडकूजी घायवान (वय६४,रा. तुपे, पुणे) हे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून रायगड पाहण्यासाठी गेले होते. खुबलढा बुरुज येथे फोटो काढत असताना पाय घसरून खाली पडून त्यांचा जागीच मृत्यू झाला. या घटनेची नोंद महाड तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## आभार



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने 'रयत'च्या रिटघर येथील श्री भैरवदेव विद्यालय आणि लोकनेते रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाला १० लाखांची मदत करण्यात आली होती. विद्यालयाने या निधीमधून १० इंटरॲक्टिव्ह पॅनल बोर्ड बसवण्याचे काम हाती घेतले आहे. दरम्यान, रिटघर विद्यालयाचे स्कूल कमिटी सदस्य राजेश भोपी, विलास भोपी, प्राचार्य बी.बी.साळुंखे, उपशिक्षक आर.एन. पाटील यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेल्या मदतीबद्दल त्यांचे आभार मानले.**

# शिक्षणाला एआय पर्याय नाही तर पुरकच ठरेल -मंत्री आशिष शेलार

**मुंबई : प्रतिनिधी**

आताच्या भारतीय शिक्षण धोरणानुसार एआय तंत्रज्ञान हे शिक्षणाला पर्याय नाही तर पुरक ठरेल या दृष्टीनेच शासन विचार करीत असून महाराष्ट्राचे ए आय धोरण तयार होत असून याबाबत आम्ही या धोरणात विचार करीत आहोत अशी माहिती, माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आज विधान परिषदेत दिली.



कृत्रिम बुध्दिमत्ता अर्थात एआय (Artificial Intelligence) हे मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनत असून भविष्यात जागतिकस्तरावर त्याची व्याप्ती अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एआयच्या वेगवान प्रवाहात टिकून राहण्याकरिता राज्यातील बऱ्याचशा शाळांमध्ये एआय आधारित शिक्षण पध्दतीचा वापर केला जात आहे.

त्यातून शिक्षण व्यवस्थेत धोके निर्माण होण्याची शक्यता असल्याचे सांगत भाजपा आमदार श्रीकांत भारतीय यांनी विधानपरिषद नियम ९७ नुसार या विषयावर चर्चा उपस्थित केली होती. या चर्चेत आमदार ॲड. अनिल परब, अमित गोरखे, अमोल मिटकरी, शशिकांत शिंदे आदी या चर्चेत सहभागी झाले.

या विषयाला उत्तर देताना मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी सांगितले की, आज जगभर एआय तंत्रज्ञानाचा वापर झपाट्याने होत आहे. त्यामध्ये निर्माण होणाऱ्या संधी, रोजगार, उद्योग आणि तंत्रज्ञान यामध्ये आपला देश मागे पडू नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या देशाचे एआय धोरण तयार करण्याची भूमिका घेतली. याच धोरणाला सुसंगत असे राज्याचे स्वतंत्र एआय धोरण तयार करण्यात येत असून अशा प्रकारचे धोरण तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे.

या धोरणासाठी तज्ज्ञांची समिती गठीत करण्यात आली असून त्यांच्या बैठका होत आहेत. या समितीसमोर शासनाने जे जे विषय ठेवले आहेत त्यामध्ये एआय आणि शिक्षणावर होणारे परिणाम हा विषय ठेवण्यात आला आहे. त्यामुळे आम्ही आश्वस्त करतो की, भारतीय शिक्षण व्यवस्थेला पुरकच ठरेल, असे राज्याचे एआय धोरण आम्ही तयार करीत आहोत तसेच शिक्षणासोबतच सायबर क्राईम या विषयाचा ही यामध्ये विचार करीत असल्याचे मंत्री शेलार यांनी सांगितले.

नवे तंत्रज्ञान जेव्हा जेव्हा येते तेव्हा तेव्हा नोकऱ्यांमधील संधी हूकणार अशी भिती निर्माण होते तसेच नवनवीन धोके ही समोर येतात म्हणूनच महाराष्ट्र राज्याने ए आयचे भविष्यातील वापर आणि धोके लक्षात घेऊन धोरण निश्चित करण्याचे ठरवले. हे धोरण तयार करताना या सगळ्या गोष्टींचा विचार करण्यात येत आहे, असेही मंत्री शेलार यांनी सांगितले.

## वीज ग्राहकांना प्रलंबित प्रकरणे निपटण्याची संधी

**कल्याण: प्रतिनिधी**

कल्याण आणि भांडुप परिमंडलातील कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित प्रकरणे तसेच वीजबिलाबाबत वाद आणि वीज चोरीच्या दाखलपूर्व व प्रलंबित प्रकरणांचा तडजोडीने निपटारा करण्याची संधी आहे. संबंधित ग्राहकांनी तालुका न्यायालय स्तरावर शनिवारी (२२ मार्च) आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन आपापली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढावीत, असे आवाहन महावितरणने केले आहे.

भांडुप आणि कल्याण परिमंडल कार्यक्षेत्रातील ठाणे, पालघर आणि रायगड जिल्ह्यातील सर्व तालुका न्यायालयात २२ मार्चला सकाळी ११ ते दुपारी दोन दरम्यान राष्ट्रीय लोक अदालत आयोजित करण्यात आली आहे. या दोन्ही परिमंडलांतर्गत कल्याण एक, कल्याण दोन, वसई, पालघर, वाशी, ठाणे आणि पेण या मंडलातील संबधित ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होण्याबाबत विधी विभागाकडून नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. नोटिस मिळाली नसेल तरीही या ग्राहकांना लोक अदालतीत सहभागी होत आपल्या प्रकरणांचा निपटारा करून घेता येणार आहे संबंधित ग्राहकांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील तालुका न्यायालयात आयोजित लोक अदालतीत सहभागी होऊन या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

## माणगावमध्ये कंटेनर खाली चिरडून तरुणाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावर अपघाताची मालिका सुरूच आहे. माणगाव शहरातील तीन बत्ती नाक्यावर कंटेनर खाली चिरडून तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



माणगांवमध्ये मुंबई गोवा हायवेवर तीन बत्ती नाका येथे दि.२० मार्च रोजी सकाळी ११:१५ च्या दरम्यान महाड कडून मुंबईकडे जाणार्या कंटेनरच्या मागच्या टायरखाली येऊन जुने माणगांव येथील राहणारा मोहम्मद रफी इस्माईल जामदार, वय वर्षे ३९ हा तरुण आपल्या ताब्यातील हिरो होंडा फॅशन प्लस घेवुन जात असताना तीन बत्ती नाका येथे कंटेनरच्या मागील टायर खाली येऊन चिरडून मोहम्मद रफी इस्माईल जामदार याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

मोहम्मद रफी इस्माईल जामदार हा जुने माणगांव येथील रहिवासी असून व्यवसायाने इलेक्ट्रिशन प्लबिंग, एसी फ्रीज मेकॅनिक म्हणून कार्यरत होता.तसेच जामदार हा आपदा मित्र म्हणून माणगांव मध्ये साळुंखे रेस्क्यू टीम मध्ये देखील कार्यरत होता.मोहम्मद रफी इस्माईल जामदारच्या पश्चात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

माणगांवमध्ये सततची वाहतूक कोंडी असते. माणगाव बायपासचे काम रखडले आहे. होळी सणासाठी कोकणात चाकरमानी येत असतात. माणगाव शहरात होळी सणापासून दररोज वाहतूक कोंडी होत आहे. वाहनचालक बेशिस्तपणे वाहन चालवित असल्याने वाहतूक कोंडी अधिक भर पडते.

या अपघातानंतर संतप्त जमावाने आक्रमक भूमिका घेत मुंबई गोवा रस्ता रोको करण्याचा प्रयत्न केला.

## ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात- डॉ.अनंत देशमुख

**पेण : रामप्रहर वृत्त**

ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात. ग्रंथ हे गुरु, मित्र, मार्गदर्शक अशा अनेक भूमिका बजावत असतातअसे प्रतिपादन एस.एन.डी.टी.विद्यापीठ मुंबई मराठी विभाग प्रमुख, डॉ.अनंत देशमुख,यांनी ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन प्रसंगी महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पेण येथे केले.



महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या ग्रंथालय संचालनालय, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथोत्सव २०२४ चे उद्घाटन महात्मा गांधी सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय, पेण येथे संपन्न झाले.यावेळी एस.एन.डी. टी.विद्यापीठ मुंबई मराठी विभाग प्रमुख, डॉ.अनंत देशमुख, सहाय्यक संचालक कोकण भवन प्रकाश पाटील, सार्वजनिक वाचनालय, अलिबाग, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या उपाध्यक्षा शैलाताई पाटील, रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोदार्डे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार, रायगड जिल्हा ग्रंथालय सदस्य नागेश कुलकर्णी, महात्मा गांधी वाचनालयाचे अध्यक्ष श्री.वनगे आदि उपस्थित होते.

यावेळी मागदर्शन करताना देशमुख म्हणाले की, मी जे काही घडलो ते पुस्तकामुळे त्यामुळे माझ्या आयुष्यात पुस्तकाचे महत्त्व हे अनन्यसाधारण आहे. प्रत्येकाला ग्रंथांचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. ग्रंथ समाजाला दिशा देण्याचे काम करतात. ग्रंथ हे गुरु, मित्र, मार्गदर्शक अशा अनेक भूमिका बजावत असतात.

श्रीमती शैलाताई म्हणाल्या की,वाचन सांस्कृतिचा ओठा ग्रंथालयात कसा येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. ग्रंथालयात येणाऱ्या वाचकाला ग्रंथापालने पुस्तकाचे महत्व पटवून दिले पाहिजे. ग्रंथपाल हा पुढील पिढी घडवणारा प्रमुख दुवा आहे.

या वेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले. प्रथम ग्रंथदिंडीने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करुन राज्यगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रस्तावित जिल्हा ग्रंथालय अधिकारी अजित पवार यांनी तर आभार प्रदर्शन शोभना पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर शेठ यांनी केले.

## तळवडे गावात शिवस्मारकाचे उद्घाटन

**नेरळ : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील तळवडे गावात शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचे भव्य, असे उद्घाटन करण्यात आले आहे.

सिंहासनावर विराजमान असलेली श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची मूर्तीची प्राण प्रतिष्ठापना करून ग्रामस्थांनी अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे दर्शन घेतले. महंत जानकीनाथ महाराज यांच्या हस्ते या मूर्तीचे उद्घाटन अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले होते.या सोहळ्यावेळी छत्रपतींचे व्याख्यान, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कर्जत तालुक्यातील तळवडे बुद्रुक या गावात अनेक वर्षे शिवजयंती उत्सवदिनी महाराजांची भव्य अशी मिरवणूक काढून उत्सव साजरा केला जात होता. गावात सर्व मंदिरे असताना मात्र श्री छत्रपतींची मूर्ती गावात नव्हती. अखेर गेली तीन वर्षे झाली गावात श्री छत्रपतींची मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना झालीच पाहिजे म्हणून ग्रामस्थांकडून निर्धार करण्यात आला होता. आज अखेर लोकसहभागातून गावाच्या प्रवेशद्वाराजवळ श्री जयंतीदिनी भव्य अशी छत्रपतींची मूर्तीची स्थापना करून उद्घाटन करण्यात आले.

या वेळी या सोहळ्याला सामाजिक,राजकीय पुढाऱ्यांनी हजेरी लावली होती.

## माणगाव उपजिल्हा रुग्णालयात ऑर्थोपेडिक डॉ.मेहता देणार सेवा



माणगाव: प्रतिनिधी

माणगाव उपजिल्हा रुग्णालयात ऑर्थोपेडिक डॉ.अभिजीत मेहता रुग्णांना देणार सेवा देण्यासाठी उपलब्ध असून डॉ.मेहता यांची नुकतीच माणगाव नगरीचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव व सहकाऱ्यांनी भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

रायगड जिल्ह्यातील माणगाव हे तालुक्याचे ठिकाण असून या ठिकाणी उपजिल्हा रुग्णालय आहे. या रुग्णालयात माणगाव, महाड,पोलादपूर, तळा, म्हसळा, श्रीवर्धन, पाली, रोहा येथून औषोधोपराचाराकरिता रुग्ण येत असतात. त्यातच माणगाव हे शहर महामार्गाला लागून असल्याने उपजिल्हा रुग्णालयाकडे रुग्णांचा कळ मोठ्या संख्येने आहे. या मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर दररोज लहान मोठे अपघात होत असतात. या अपघातातील जखमींना प्राथमिक उपचारासाठी माणगाव उपजिल्हा रुग्णालयात आणले जाते.

याठिकाणी हाडांच्या समस्या असणाऱ्या रुग्णांना ऑर्थोपेडिक डॉक्टरची कमतरता भासत होती. याकडे सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा मानून माणगावकरांच्या विनंतीला मान देऊन माणगाव येथील वक्रतुंड हॉस्पिटलचे ऑर्थोपेडिक डॉक्टर अभिजीत मेहता यांनी हाडांच्या समस्या असणाऱ्या रुग्णांना सेवा देण्यास सुरुवात केली आहे.

डॉ.अभिजित मेहता हे माणगाव उपजिल्हा रुग्णालयामध्ये बुधवारी ओपीडीमध्ये सकाळी १० ते ४ या वेळेमध्ये समाजसेवा म्हणून उपलब्ध असणार आहेत. (ऑर्थोपेडिक) हाडांच्या समस्या असणाऱ्या रुग्णांनी उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपलब्ध सुविधेचा लाभ घ्यावाअसे आवाहन माजी नगराध्यक्ष आंनद यादव यांनी केले आहे. उपजिल्हा रुग्णालयामध्ये (ऑर्थोपेडिक) हाडाचे तज्ञ डॉ.अभिजीत मेहता सेवा देत असल्याबद्दल त्यांना बुधवार दि.१९ मार्च रोजी माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक आनंद यादव,उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.दीपक देशमुख,माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे,माजी उपनगराध्यक्ष दिलीप जाधव,माजी उपनगराध्यक्ष संदिप खरंगटे,माजी नगरसेवक जयंत बोडरे, दिलीप अंबुर्ले,निलेश यादव आदींनी शुभेच्छा दिल्या.

## नवी मुंबई विमानतळ प्रकल्पबाधितांसाठी १३ भूखंडांची संगणकीय सोडत

नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा

आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांकरिता पुनर्वसन व पुन:स्थापना योजनेंतर्गत १२ आणि २२.५ टक्के योजनेंतर्गत १ याप्रमाणे एकूण १३ भूखंडांची संगणकीय सोडत गुरुवार, दि. २० मार्च रोजी सिडको भवन येथे यशस्वीरीत्या पार पडली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व तद्अनुषंगिक कामांकरिता संपादित करण्यात आलेल्या जमिनी व बांधकामाच्या मोबदल्यापोटी प्रकल्पबाधितांना भूखंडांचे वाटप करण्यात आले.

यावेळी शान्तनु गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक, सुरेश मेंगडे, मुख्य दक्षता अधिकारी, नवनाथ जरे, मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (न.मुं.आं.वि.), गीता पिल्लई, महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) आणि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या सोडतीकरिता मौजे-चिंचपाडा विठ्ठलवाडी येथील २० मीटर पट्ट्यासाठी संपादित करण्यात आलेल्या बांधकामांकरिता ३, राष्ट्रीय महामार्ग ४ बी आम्रमार्ग अंतर्गत संपादित करण्यात आलेल्या बांधकामांकरिता ८ तसेच ७० मीटर आम्रमार्गासाठी संपादित केलेल्या बांधकामाकरिता १ आणि २२.५% योजने अंतर्गत पूर्वी वाटप केलेली पात्रता रद्द करून एकत्रित पात्रतेकरिता १ या प्रमाणे एकूण १३ बांधकामधारक/भूखंडधारक पात्र ठरले आहेत. या भूखंडधारकांना सदर सोडतीद्वारे भूखंडांचे वाटप करण्यात आले.

## 'राजकीय पक्षांनी यादीभाग निहाय बीएलए यांची नेमणूक करावी'

रायगड : रामप्रहर वृत्त

मतदार याद्या अचूक व दोषविरहित असणे आवश्यक आहे. मतदार याद्या तयार करण्याच्या प्रक्रियेत राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची आहे. तरी राजकीय पक्षांनी यादीभाग निहाय बीएलए यांची नेमणूक करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

या वेळी माहिती देताना जिल्हाधिकारी जावळे यांनी सांगितले की, १९ मार्च २०२५ रोजी रायगड जिल्हयामध्ये पुरुष मतदार १२ लाख आठ हजार ९२६, स्त्री मतदार-१२ लाख ५२ हजार ३४० तर तृतीय पंथी मतदार ९५ असे एकूण मतदार संख्या २५ लाख ३३ हजार ३६१ इतकी आहे. या सर्व मतदार यादीभागाचा बीएलओ व राजकीय पक्ष यांनी नेमलेले बीएलए यांच्यामार्फत मतदार यादी पडताळणी केली जाईल. यामुळे यादीतील मयत, स्थलांतरीत, दुबार मतदारांची वगळणी करणे, मतदारांच्या तपशीलात दुरुस्ती करणे अधिक सुलभ होईल.

## मानवी आरोग्यासाठी विषमुक्त अन्नच रामबाण उपाय -ज्ञानेश्वर बोडके

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोकणातील शेतकऱ्यांनी आंबा, काजू, भात या पिकांबरोबर देशी गाय आधारित एकात्मिक पद्धतीने विषमुक्त शेती पिकवल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्या समृद्ध होण्याबरोबरच त्याचे व इतरांचेही आरोग्य चांगले राहण्यास मदत होणार असल्याचे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते, अभिनव फार्मर्स क्लब चे संस्थापक ज्ञानेश्वर बोडके यांनी व्यक्त केले.

जे.एस.डब्लू. फाऊंडेशन साळाव पुरस्कृत कुंडलिका कृषी फार्मर्स प्रोड्युसर कंपनी तर्फे आयोजित एकात्मिक सेंद्रिय शेती या एकदिवसीय कार्यशाळेमध्ये ते बोलत होते, ते पुढे म्हणाले. भविष्यात शेतकरी बांधवानी आर्थिकदृष्टया समृद्ध व्हायचे असेल तर एक पीक पद्धतीला फाटा देत एकात्मिक सेंद्रिय शेती करणे आवश्यक आहे. ग्राहकाला देव समजून, विषमुक्त भाजीपाला व अन्न, पिकवण्यावर जास्त भर दिला पाहिजे. फॅमिली डॉक्टर असतो त्याप्रमाणे फॅमिली शेतकरी ही संकल्पना राबविण्याने शेतकरी स्वत: तर समृद्ध होईलच त्याच बरोबर विषमुक्त शेतमालामुळे ग्राहकांचे ही आरोग्य चांगले राहण्यास मदत होईल. जे. एस. डब्लू. फाऊंडेशन व शासनातर्फे शेती विषयक राबवण्यात येत असलेले उपक्रम यशस्वी करण्यासाठी होतकरू शेतक-यांना पुढे येण्याचे आवाहन केले.



शेतकरी बांधवानी हवामान बदलाला तोंड देण्यासाठी आपल्या शेतातील काहीसा भाग संरक्षित शेतीकडे वळवला पाहिजे. रासायनिक खते व औषधांच्या अतिवापरामुळे मानवी आरोग्यावरती विपरीत परिणाम होत असून विषमुक्त मिश्र अन्न पिकविणे हि काळाची गरज असल्याचे प्रतिपादन केले. शेतकरी बांधवानी भविष्यात आयटी क्षेत्रासारखे स्मार्ट वर्क करायला शिकले पाहिजे. शेती पिकवण्या बरोबरच शेतमाल स्वतः विकायला शिकले पाहिजे, तरच शेती शेतकऱ्यांना तारू शकेल त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला माल आपणच विकण्याचा कानमंत्र दिला.

यावेळी अभिषेक कुलश्रेष्ठ, उप प्रबंधक फायर अँड सेफ्टी विभाग, चोरढे सरपंच तृप्ती घाग, तलेखार सरपंच विजय घाणेकर, महात्मा गांधी विद्यामंदिर चोरढे चेरमन धर्मा भोईर, कृषी साहाय्यक. विशाल चौधरी, कुंडलिका प्रोड्युसर बीजामृत फार्मर्स प्रोड्युसर तसेच फणसाड भूमी फार्मर्स प्रोड्युसर संचालक व शेतकरी उपस्थित होते.

**पान १ वरुन**

## महाड परिसरात भीमसृष्टीची निर्मिती करणार

दोन वर्षांनी येणाऱ्या चवदार तळे सत्याग्रहाच्या शतकपूर्ती वर्धापन दिना संदर्भात शासन तातडीने मंत्रिमंडळाच्या उच्चस्तरीय बैठकीमध्ये कार्यक्रमाची निश्चिती करेल, असे त्यांनी जाहीर केले.

चवदार तळे सत्याग्रहाच्या ९८व्या वर्धापन दिनाला संपूर्ण देशभरातून काल सायंकाळपासूनच लाखो भीमभक्त अनुयायी दाखल होण्यास सुरुवात झाली होती. येणाऱ्या सर्व भीम अनुयायांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी नगरपालिका प्रशासन जिल्हा प्रशासन आणि चोख व्यवस्था केली आहे. या कार्यक्रमात कोणतीही उणीव राहू नये या दृष्टिकोनातून महाड शहर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक संतोष जाधव व डीवायएसपी शंकर काळे यांनी पोलीस दलाची ही रचना केली असून २०० पोलीस व २८ अधिकारी याकरिता नियुक्त केल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

चवदार तळे विचार मंचाच्यावतीनेही मागील काही वर्षांपासून या ठिकाणी विशेष उपक्रमांचे तसेच जलपान व नाश्ता भोजनाची मोफत व्यवस्था केल्याची माहिती विचार मंचाच्या वतीने या वेळी देण्यात आली.

## नेरळ पोलीस ठाण्यात दामिनी पथक

**नेरळ : प्रतिनिधी**

शाळा, महाविद्यालयीन तरुणी, महिलांची होणारी छेडछाड प्रकार रोखण्यासाठी आता नेरळ पोलीस ठाण्यात स्वतंत्र दामिनी पथक स्थापन करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावर उभे राहून रोडरोमिओगीरी करत फिरणाऱ्यांवर चांगलाच चाप बसणार आहे.

मुलींबाबत छेडछाड हे प्रकार कर्जत तालुक्यातून समोर येत असल्याने महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाकडून खबरदारी घेण्यात आल्याचे दिसून येत असून नेरळ पोलीस ठाण्यात दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली.आता तक्रार येताच पाच मिनिटातच हे पथक मदतीसाठी घटनास्थळी दाखल होणार आहे.



शहरातील बहुतेक शाळा व महाविद्यालयांत विद्यार्थिनींसाठी सुरक्षिततेचे वातावरण नसते. बाहेरून येणाऱ्या टवाळखोर मंडळींचा परिसरात धुमाकूळ सुरू असतो. कट्टे अथवा कॅम्पस्च्या परिसरातील टोळक्यांकडून युवतींची छेडछाड केली जाते. ही बाब लक्षात घेऊन दामिनी पथकाने अशा टवाळखोरांना धडा शिकविण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचाच एक भाग म्हणून 'महिलांची सुरक्षितता व मदतीसाठी सदैव तत्पर' अशा दामिनी पथकाची नेरळ पोलीस ठाण्यात स्थापना करण्यात आली.

या वेळी कोणी पीडित महिलांनी हेल्पलाईन क्रमांकावर युवती वा महिलांनी अशा प्रकारांची माहिती दिल्यास टवाळखोरांचा दामिनी पथक त्वरित बंदोबस्त करेल, असे नेरळ महिला पोलीस उपनिरीक्षक प्राची पांगे यांच्याकडून सांगण्यात आले आहे.

## निवडक

### उलवे येथून विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** घरकामासाठी जाते असे सांगून घराबाहेर पडलेली एक विवाहिता महिला अद्याप घरी न परतल्याने



ती हरविल्याची तक्रार उलवे पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. बिऊरा दिपक बिश्वकर्मा (३६ रा.सेक्टर ८, उलवे) रंग गोरा, उंची पाच फुट, चेहरा गोल, डोळे काळे, नाक सरळ, केस काळे वाढलेले असून, अंगात लाल कुडता व पायामध्ये शुज आहेत. तिला हिंदी भाषा अवगत आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी उलवे पोलीस ठाणे किंवा हवालदार किशोर कर्डीले (९००४७४७५१२) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**पनवेल :** पंधरा वर्षीय मुलीवर अत्याचार केल्याप्रकरणी आरोपीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित मुलगी आणि आरोपी एकाच ठिकाणचे राहणारे आहेत. यातील आरोपी याने पीडीत अल्पवयीन मुलीला तुझ्यावर प्रेम आहे, मी तुझ्यासोबत लग्न करणार आहे असे बोलून लग्नाचे आमिष दाखवले आणि त्याच्यासोबत फिरायला जाण्यास विरोध केल्यास मारून टाकेल अशी दमदाटी केली आणि तिच्यावर अनेकदा अत्याचार केले. या प्रकाराची माहिती मिळाल्यानंतर आई-वडिलांनी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात २९ वर्षीय आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

# ‘सीकेटी’त जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुणांचे राष्ट्र म्हणून समग्र विश्वात भारत देशाची ख्याती आहे. याच देशातील युवकांना देशातील संसदीय शासन प्रणाली, विधीनिर्मिती प्रक्रिया आणि विकसित भारताबाबत असणाऱ्या बहुविध परीपेक्ष्याचे विवेचन करण्यासाठी भारत सरकारच्या युवक कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालयासोबतच्या सामंजस्य करारान्वये जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, (स्वायत्त)ची रायगड जिल्ह्याचे नोडल सेंटर म्हणून निवड झाली असून, अनुक्रमे महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे रायगड जिल्हास्तरीय विकसित भारत युवा संसदेचे महाविद्यालयाच्या संकुलात २१ आणि २२ मार्च २०२५ रोजी आयोजन





करण्यात येत आहे.

स्पर्धेच्या नोंदणीची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन पद्धतीने माय भारत पोर्टलच्या माध्यमातून करण्यात आली होती. ज्यामध्ये What does Viksit Bharat mean to you ? या विषयवार ०१ मिनिटाचा व्हिडीओ बनवून तो उपरोक्त पोर्टलवर अपलोड करावयाचा होता. यानंतर स्क्रीनिंग समितीने सर्व व्हिडीओ ची तपासणी करून पात्र स्पर्धकांना ऑफलाईन स्पर्धे करिता निमंत्रित करण्यात आले आहे. या फेरीसाठी One Nation One Election: Paving the Way for Viksit Bharat या विषयवार सर्व स्पर्धक तीन मिनिटे आपले विचार प्रकट करतील ज्याचे मुल्यांकन सामग्रीची प्रासंगिकता, मौखिक संवाद, देहबोली, प्रभावी सादरीकरण, सर्जनशीलता, भाषेवरील प्रभुत्व, वेळेचे यथोचित व्यवस्थापन आदींच्या आधारे तज्ञ परीक्षकांच्या समितीमार्फत केले जाईल. सदर फेरीसाठी संपूर्ण रायगड जिल्ह्याच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त असा सहभाग नोंदविला आहे.

स्पर्धेच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर, परिक्षण समितीमध्ये रायगड जिल्ह्याचे युवा अधिकारी निशांत रौटेला, पनवेल तालुक्याचे तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी विजय पाटील, निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार, संजय भालेराव, कीर्ती महाविद्यालय दादर च्या सार्वजनिक धोरण विषयाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. चंद्रमोहन जोशी, मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे रायगड जिल्हा समन्वयक प्रा. टी. पी. मोकल, मुंबई विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य मयुरेश नेतकर आदींचा अंतर्भाव आहे.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य कार्यक्रम अधिकारी तथा नोडल सेंटरचे समन्वयक डॉ. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली पाटील, प्रा. पूजा दांदळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. रूपेश माने विशेष परिश्रम घेतले.

## वीर वाजेकर महाविद्यालयात ‘ग्लोबल वॉर्मिंग’वर पोस्टर प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय फुंडे (उरण)च्या BMS आणि BAF विभागाच्या वतीने होळीच्या निमित्ताने ‘ग्लोबल वॉर्मिंग’ या महत्त्वपूर्ण विषयावर पोस्टर सादरीकरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना जागतिक तापमानवाढीचे परिणाम, त्याची कारणे आणि त्यावरील उपाय याबद्दल जागरूक करणे हा होता.

विद्यार्थ्यांनी तापमानवाढीमुळे होणारे पर्यावरणीय संकट, वाढते वायू प्रदूषण, जंगलतोड, बर्फाच्या शिखरांचे वितळणे, हवामान बदल आणि जैवविविधतेवरील परिणाम यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर प्रभावी पोस्टर तयार केली. यासोबतच



ग्रीन एनर्जीचा वापर, प्लास्टिकचा कमी उपयोग, झाडे लावा-झाडे जगवा यासारख्या उपाययोजनांवरदेखील विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेतून विचार मांडले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रभारी प्राचार्य डॉ. अमोद ठक्कर यांनी विद्यार्थ्यांच्या कलाकृतींचे निरीक्षण करून त्यांचे कौतुक केले. ते म्हणाले, होळी हा रंगांचा आणि पर्यावरण संवर्धनाचा उत्सव आहे. परंतु वाढत्या तापमानामुळे पर्यावरण धोक्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरण जागरूकतेच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बीएमएस विभागप्रमुख भूषण ठाकूर आणि प्राध्यापिका प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेणू सरोज आणि आरती पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांनी फक्त शैक्षणिक ज्ञानच नव्हे, तर सामाजिक जबाबदारीची जाणीवही आत्मसात केली. भविष्यात अशीच पर्यावरणपूरक उपक्रम घेण्याचा निर्धार विद्यार्थ्यांनी केला, ज्यामुळे हा उपक्रम अत्यंत प्रेरणादायी ठरला.

## अवैधरित्या उभ्या ट्रेलर, सिमेंट टँकर, बल्करवर वाहतूक पोलिसांची कारवाई

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील सिडकोच्या द्रोणागिरी नोड परिसरातील पंजाब कॉन्व्हेर ते अल्ट्राटेक सिमेंट कंपनी रोडवर अवैध पार्क करणाऱ्या ट्रेलर, सिमेंट मिक्सर, टँकर, बल्कर यासारख्या तीन हजार २४२ अवजड वाहनांवर उरण वाहतूक शाखेच्या पोलिसांनी मागील वर्षभरात दंडात्मक कारवाई केली आहे.

यापुढे ही वरील प्रमाणे अशाच प्रकारे अवजड वाहनांची रस्त्यावर पार्किंग केल्यास कोणत्याही प्रकारची हायगय



न करता संबंधित वाहनावर तात्काळ दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी वाहनचालकांना सूचित केले आहे.

याचप्रमाणे सदरची कारवाई सातत्याने पुढे सुरु असुन सोबतच चालकांना आपले वाहन द्रोणागिरी नोड पागोटे गावाजवळील टिआयपीएल पार्किंग मध्ये लावणेबाबत वेळोवेळी आवाहन करण्यात आले आहे.

याशिवाय तसेच ठिकठिकाणीच्या शाळा कॉलेज वाहनतळजवळ वाहतूक सुरक्षेबाबत प्रभोधनाचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत. रोडवर अवैध पार्क करण्यात आलेल्या वाहनांवर मागील वर्षभरात मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई केली असल्याने सदर ठिकाणी होणारे अपघात कमी करण्यात वाहतुक पोलिसांना यश आले असुन सदर ठिकाणी वाहने पार्क करू नये म्हणुन, ट्रान्सपोर्टर तसेच अल्ट्राटेक कंपनी ला नोटीस अदा करण्यात आली आहे.

यापुढेसुद्धा दंडात्मक कारवाई अधिक तीव्र स्वरूपात करण्यात येणार असल्याचे उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी स्पष्ट केले आहे.

# जेएनपीएला जोडणाऱ्या ग्रीनफिल्ड महामार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी


**उरण : प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक व्यवहारविषयक केंद्रीय मंत्रिमंडळ समितीने उरण तालुक्यातील जेएनपीए बंदराला जोडणाऱ्या पागोटे ते चौक असा २९ किमी सहा पदरी प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड द्रुतगती राष्ट्रीय महामार्ग बांधायला मंजुरी दिली आहे. हा प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा (बीओटी) या तत्त्वावर विकसित केला जाणार असून त्यासाठी एकूण ४५००.६२ कोटी रुपये भांडवली खर्च होणार आहे.पंतप्रधान गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन तत्त्वांअंतर्गत भारतातील प्रमुख आणि लहान बंदरांशी जोडणाऱ्या रस्त्यांच्या पायाभूत सुविधांचा विकास हा एकात्मिक पायाभूत सुविधा नियोजनाच्या प्रमुख प्राधान्य क्षेत्रांपैकी एक आहे.

जेएनपीए बंदरातील कंटेनरचे वाढते प्रमाण आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा विकास, या गोष्टी लक्षात घेता या प्रदेशातील राष्ट्रीय महामार्ग दळणवळण वाढवण्याची गरज ओळखली ओळखली आहे. सध्या पळस्पेफाटा, डी-पॉईंट, कळंबोली जंक्शन, पनवेलसारख्या शहरी भागातील प्रचंड वाहतूक कोंडीमुळे जेएनपीए बंदरातून निघालेल्या वाहनांना राष्ट्रीय महामार्ग-४८ चा मुख्य सुवर्ण चतुर्भुज (जीक्यू) टप्पा आणि मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर पोहचायला २ ते ३ तास लागतात.२०२५ साली नवी मुंबई विमानतळ कार्यान्वित झाल्यावर थेट दळण वळणाची गरज आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

त्यानुसार, कनेक्टिव्हिटीच्या या गरजा पूर्ण करण्यासाठी आणि जेएनपीए बंदर आणि नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ जोडण्याची लॉजिस्टिक कार्यक्षमता सुधारण्यासाठी हा प्रकल्प आखण्यात आला आहे. हा प्रकल्प जेएनपीए बंदर एनएच ३४८ उरण तालुक्यातील पागोटे येथे सुरू होईल. मुंबई-पुणे महामार्गावर एनएच -४८ संपेल, तसेच तो मुंबई पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई गोवा राष्ट्रीय मार्गाला एनएच -६६ देखील जोडला जाणार आहे. व्यावसायिक वाहनांच्या वाहतुकीसाठी सह्याद्री पर्वत रांगेत दोन बोगदे खणले जातील.

जेणेकरून या वाहनांना डोंगराळ भागात घाटातून प्रवास करावा लागणार नाही, तसेच मोठ्या कंटेनर ट्रकचा वेग वाढेल आणि त्याची सुलभ वाहतूक होईल. नवीन सहा पदरी ग्रीन फिल्ड प्रकल्प कॉरिडॉरमुळे बंदराचे दळणवळण सुधारेल तसेच सुरक्षित आणि कार्यक्षम मालवाहतुकीला सहाय्य मिळेल. या प्रकल्पामुळे मुंबई आणि पुणे आणि आसपासच्या विकसनशील परिसरात विकास आणि समृद्धीचे नवे मार्ग खुले होणार आहेत.



## पनवेलकरांनी दाखवली सामाजिक सलोख्याची ताकद

### * मुस्लीम बांधवांकडून पोलिसांचा सत्कार

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहराने पुन्हा एकदा सर्वधर्म समभावाचा आणि एकतेचा आदर्श निर्माण केला आहे. यंदा रमजानचा पवित्र महिना आणि होळी सणांचे एकाच वेळी आगमन झाले असताना, शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यात पनवेल शहर पोलिसांना मोठे यश मिळाले.

या महत्त्वपूर्ण कामगिरीसाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांचा मुस्लिम बांधवांनी जाहीर सन्मान केला. मागील काही घटनांमुळे पनवेलमधील वातावरण काहीसे तणावपूर्ण बनले होते. अशा परिस्थितीत रमजान आणि हिंदू सणांचे एकत्र येणे हे पोलिसांसाठी मोठे आव्हान होते, मात्र वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी उत्कृष्ट नियोजन आणि प्रभावी धोरणे अंमलात आणून शहरात शांतता आणि सलोखा कायम ठेवला. त्यांच्या या प्रयत्नांमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये सुरक्षिततेचो भावना वाढली.

या शांततापूर्ण बातावरणासाठी मुस्लिम समाजातील नागरिकांनी एकत्र येत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या कार्यांची दखल घेतली. पनवेल एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन इकबाल काशी यांच्या नेतृत्वाखाली नवीद पटेल, फक्कू मुबारक, पत्रकार डॉ. मुनीर तांबोळी, पत्रकार हनीफ कच्छी, पत्रकार वसीम पटेल, मुद्दसिर पटेल, मन्सूर पटेल, इम्तियाज बेग, उबेद पवार, जबाद काझी, इस्माईल तांबोळी, संतोष पवार, सलमान मुकादम यांच्यासह अनेक मुस्लिम बांधवांनी ठाकरे यांना शाल आणि पुष्पगुच्छ देऊन आपली कृतज्ञता व्यक्त केली.



## दहा लाखांची फसवणूक; तिघांवर गुन्हा दाखल

**पनवेल : वार्ताहर**

गोट फार्म बांधण्यासाठी आलेल्या खर्चाची खोटी बिले व कलेक्टर असल्याचे भासवून दहा लाखांची फसवणूक करण्यात आली. या प्रकरणी तिघांविरोधात खांदेश्वर पोलिसांनी गुन्हा दाखल केला अभिषेक अशोक वाळंज, श्रीकांत अशोक वाळंज, चंद्रकांत केंडे अशी आरोपींची नावे आहेत.

संजना रसाळ या नवीन पनवेल येथे राहत असून अभिषेक वाळंज व श्रीकांत चाळंज यांनी नागोठणे येथे गोट फार्म बकरी व्यवसाय चालू करण्याची कल्पना दिली. त्यासाठी त्यांना जागाही दाखवली. याशिवाय चंद्रकांत शेंडे हे रायगडचे कलेक्टर असल्याची ओळख करून दिली. कलेक्टर आल्याने गोट फार्म बनवण्यासाठी लागणारे साहित्य स्वस्त दरात मिळाल्याचे आणि ते व्यवसायात भागीदार असल्याचे सांगितले त्यानुसार त्यांनी ९ लाख रुपयांचा धनादेश व त्यांच्या पतीने दोन लाख रुपये त्यांच्या खात्यात जमा केले, परंतु सहा महिने भागीदार म्हणून काम केल्यानंतर भागीदारीचा फायदा त्यांना दिला नाही. तसेच गोट फार्मसाठी केलेल्या खर्चाचा हिशोब मागितला असता एक लाख रुपये रसाळ यांच्या खात्यात जमा केले व हिशोबाच्या पावत्या दाखविल्या नाहीत. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच याबाबतची तक्रार त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात दाखल केली.

## कामोठे पोलिसांच्या तत्परतेमुळे विवाहितेचा जीव वाचला

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे पोलिसांच्या तत्परतेमुळे एका विवाहित महिलेचा जीव बचावल्याची घटना घडली आहे.

कामोठे परिसरातून बेपत्ता झालेल्या महिलेने पतीला फोन करून मला वाचवा, मी अडचणीत असल्याची माहिती दिली होती. या एका फोनवरून कामोठे पोलिसांच्या पथकाने मध्य प्रदेशातल्या मोयाखेडा गावातून तिची सुखरूप सुटका केली आहे. त्या ठिकाणी तिला एक लाखाला विकून तिचे जबरदस्तीने लग्न लावल्याचे समोर आले. ही महिला महिन्यापूर्वी बेपत्ता झाली होती.

कौटुंबिक वादातून तिने घर सोडल्याची तक्रार पतीने पोलिसांकडे केली होती. तिच्या पतीच्या मोबाईलवर आलेल्या अज्ञाताच्या फोनवरून त्यांच्या पत्नीने त्यांना संपर्क साधून आपण धोक्यात असल्याची कल्पना दिली होती. याबाबत पतीने पोलिसांना कळवताच या नंबरवर संपर्क साधला असता, मध्य प्रदेशमधील ठिकाणाची माहिती मिळाली, मात्र प्रत्यक्षात कामोठे पोलिसांचे पथक त्या ठिकाणी गेले व काही केल्या त्या महिलेचा शोध घेऊन तिची सुटका करायची या जिद्दीवर कामोठे पोलीस पथक उतरले होते.

## आदई गावामध्ये चोरांची दहशत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आदई गावामध्ये पुन्हा चोरट्यांची दहशत पहावयास मिळत आहे. आदई येथील पुष्प विनायक सोसायटीत चोरट्यांनी चोरी करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाला आहे

चोरट्यांनी त्यांचा मोर्चा पनवेल तालुक्यातील गावांकडे वळवला आहे. गावांमध्ये देखील मोठ्या प्रमाणात सोसायटी झाले आहेत. काही सोसायटीतील नागरीक गावाला गेल्याने बंद असलेले घर चोरटे सावज करत आहेत. काही दिवसांपूर्वीदेखील आदई मध्ये चोरीचा प्रयत्न करण्यात आला होता. तर काही घरातील मौल्यवान वस्तू चोरांनी चोरून नेल्या होत्या. असाच प्रकार पुष्प विनायक सोसायटीमध्ये घडला आहे. चोरांनी चोरीचा प्रयत्न केला. सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेरात हे चोरटे कैद झाले आहेत. पोलिसांनी या चोरांचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे.

## आज ‘सन्मान नारी शक्तिचा’

**पनवेल : वार्ताहर**

सहकार भारती या संस्थेच्या पनवेल महानगर जिल्ह्याच्या वतीने सन २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत महिलांसाठी संवाद सहकारचा - सन्मान नारी शक्तिचा या कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि.२२) पनवेलमध्ये केले आहे.

कार्यक्रमात सहकाराच्या विविध क्षेत्रांत (सह. बँका, पतसंस्था, महिला बचत गट, गृहनिर्माण संस्था, ऑडिटर्स इत्यादी) विशेष उल्लेखनीय कामगिरी केलेल्या पनवेल महानगर क्षेत्रातील महिलांच्या कार्याचा गौरव करण्यात येणार आहे. सहकार क्षेत्रातील व समाजातील नामांकित प्रथितयश महिला वक्त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थितांना उदबोधित करण्यात येऊन सहकार क्षेत्रातील यशस्वी वाटचालीसाठी मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रम श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, मार्केट यार्ड, पनवेल येथे सायंकाळी ४ वाजता होणार आहे.

## संपादकीय

# सुधारणा स्वागतार्हच

देशातील निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी सातत्यपूर्ण उपाययोजना आवश्यक असून केंद्रातील मोदी सरकार आणि केंद्रीय निवडणूक आयोग नेहमीच त्यादृष्टीने प्रयत्नशील राहिले आहेत. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार ओळखपत्र आधारशी जोडण्याबाबत चर्चा करण्यासाठी नुकतीच एक महत्त्वपूर्ण बैठक घेतली. निवडणूक आयोगाच्या संबंधित हालचालींचे सगळ्यांकडून स्वागतच केले जाते आहे.

**मतदार ओळखपत्र आणि आधार क्रमांक यांची जोडणी ही सध्याच्या कायद्यानुसार तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित आदेशानुसार होणार असून त्याकरिता आधार आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांमध्ये लवकरच सल्लामसलत सुरू होणार आहे असे निवडणूक आयोगाने नुकतेच एका बैठकीनंतर स्पष्ट केले. या दोन्ही क्रमांकांची जोडणी केल्यास बनावट मतदारांचा प्रश्न सुटू शकेल असे मानले जाते. मतदार ओळखपत्र आणि आधार क्रमांक एकमेकांना जोडल्याने मतदारसूची तयार करताना सोयीचे होणार आहे तसेच मतदारांजवळ एकाहून अधिक मतदार ओळखपत्रे असण्याचा प्रश्नही यामुळे संपुष्टात येईल असे मानले जाते. अर्थात अशी जोडणी करणे हे आव्हानात्मक तांत्रिक काम असून तसे करताना काही घटनात्मक अडचणीही सामोऱ्या येऊ शकतात. भारताच्या राज्यघटनेनुसार मतदानाचा अधिकार केवळ भारतीय नागरिकालाच मिळू शकतो. आधार कार्ड हे केवळ त्या व्यक्तीचे ओळखपत्र असते. आधार कार्डाला नागरिकत्वाचा पुरावा मानले जात नाही. त्यामुळे मतदार यादी आणि आधार माहितीची ही जोडणी ऐच्छिक असणार असून जे नागरिक आधार तपशील मतदार ओळखपत्राशी जोडणार नाहीत त्यांची नावे मतदार यादीतून वगळली जाणार नाहीत हे केंद्र सरकारने यापूर्वीच राज्यसभेत स्पष्ट केले आहे. आधार कार्डांशी पॅन व बँक खाती जोडलेली असल्यामुळे नव्या जोडणीमुळे नागरिकांच्या गोपनीयतेच्या घटनात्मक अधिकाराचे उल्लंघन होईल, असा आक्षेपही काही जणांकडून नोंदवला जातो आहे. पुढे ही जोडणी सक्तीची करण्यात आल्यास काय, अशीही विचारणा होते आहे. अशा आक्षेपांमुळे काही घटनात्मक व व्यावहारिक अडचणी या जोडणीच्या मार्गात उद्भवू शकतात. त्यामुळे ही सारी आव्हाने ओलांडत ही जोडणी प्रत्यक्षात यायला काही काळ लागू शकतो. अर्थात निवडणूक आयोगाने वेगाने हे काम पार पाडण्याचे ठरवलेले दिसते आहे. प्रत्येक निवडणुकीच्या वेळी मतदारयाद्यांमध्ये घोळ असल्याचे आरोप केले जातात. आधारकार्डांची रचना बायोमेट्रिक असल्याने आधार आणि मतदार ओळखपत्रांची जोडणी झाल्यास मतदारांची नेमकी ओळख पटवणे शक्य होऊ शकेल. त्यामुळे बोगस मतदान टाळता येईल तसेच मतदार याद्यांमधील घोळ दुरुस्त करण्यासही त्याचा उपयोग करता येऊ शकेल असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. नव्या मतदारांची नोंदणी करताना तसेच जुन्या मतदारांच्या नाव, पत्ता आदी बाबींमध्ये बदल वा दुरुस्ती करताना या जोडणीची मदतच होईल. आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदार ओळखपत्र अशी तीन-तीन कार्डे बाळगण्यास नागरिकांना भाग पाडण्यापेक्षा यांचे मिळून एकच कार्ड करायचे झाल्यासही ही जोडणी आवश्यक ठरेल. अशा तऱ्हेने जोडणीचे अनेक फायदे दिसत असले तरी सगळी माहिती एकत्र ठेवल्यास त्या माहितीच्या चोरीची व गैरवापराची भीतीही आहेच. ग्रामीण व दुर्गम भागात अनेक नागरिकांपर्यंत अद्याप आधार कार्ड पोहचलेले नाही. अशा सगळ्यांना सामावून घेत आधार व मतदार ओळखपत्रांची शंभर टक्के जोडणी झाल्यावरच मतदान प्रक्रियेत खऱ्या अर्थाने सुधारणा झाली, असे म्हणता येईल.**

# अनधिकृत नळ कनेक्शन काढण्याचे आव्हान



**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

उन्हाळा सुरु झालाय आता रायगड जिल्ह्यातील काही भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवेल. सध्या काही तालुक्यांमध्ये टँकरने पाणीपुरवठा करवा लागतोय. पुढे टंचाईग्रस्त गावांची संख्या वाढणार आहे. दरवर्षी टंचाईग्रस्त गावांचा आकडा वाढत आहे. पाणीपुरवठा योजनावर दरवर्षी करोडो रुपये खर्च होऊनही टंचाईग्रस्त गावांची संख्या कमी होण्या ऐवजी वाढत आहे. काही ठिकाणी नैसर्गिक पाणी टंचाई आहे.काही ठिकाणी मानवनिर्मित पाणी टंचाई आहे. अनधिकृत नळ कनेक्शन हे पाणी टंचाईचे एक कारण आहे. अनधिकृत नळ कनेक्शन काढण्याचे आव्हान जिल्हा परिषदेसमोर आहे. ही अनधिकृत नळ कनेक्शन काढून टाकली तर अनेक गावांमधील पाणी टंचाईची समस्या सुटेल. त्यासाठी धाडसी निर्णय घ्यावे लागतील.

टँकर ही तातपुर्ती उपाययोजना आहे. जर पाणी समस्या सोडवायची असेल तर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्या लागतील. जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठ योजना राबविण्यात येत आहे. गेली काही वर्ष या योजनच पूर्ण झालेल्या नाहीत. त्या पूर्ण झाल्या तर जिल्ह्यातील पाणी समस्या बर्यापैकी सुटेल. जिल्ह्यातील धरणाचे प्रकल्प पूर्ण करावे लागतील आपल्याकडे जी धरण आहेत त्यातील गाळ काढून त्यांची पाणी साठवण क्षमता वाढवावी लागेल. रायगड जिल्ह्यात जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमातून एक हजार ४९६ पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात आल्या. या योजनांपैकी ७५१ योजनांची कामे पूर्ण झाली आहेत. तर २२३ योजनांची कामे अंतिम टप्प्यात आहेत. जनतेला स्वच्छ आणि शुद्ध पिण्याचे पाणी मिळावे. तसेच गावातील महिलांचा त्रास कमी व्हावा, यासाठी केंद्र सरकारमार्फत जलजीवन मिशन ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेमध्ये प्रतिदिन प्रतिमाणसी किमान ५५ लिटर याप्रमाणे पाण्याची उपलब्धता करणे अपेक्षित आहे. त्यामुळे या योजना पूर्ण होणे आवश्यक आहे.

अलिबाग तालुक्यातील रेवस परिसरात पावसाळ्यात देखील पिण्याच्या पाण्याची टंचाई असते. या परीसरातील डावली रांजणखार येथील महिलांनी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला होता. आमच्या गावाची पाणीपुरवठा योजना पूर्ण करा. अनधिकृत नळ कनेक्शन काढून टाका अशी या लोकांची मागणी होती. या भागात काही मोठ्याप्रमाणात अनधिकृत नळ कनेक्शन आहेत. त्यामुळे टोकावरील गावांना पाणी मिळत नाही. रेवस गावातदेखील अशीच परिस्थिती आहे. रोहा तालुक्यातील २६ गाव उजवा तीर, डावा तीर पाणीपुरवठा योजनेची कामे पूर्ण झाली असून, योजनेत समाविष्ट गावांना सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याबाबत ग्रामस्थांनी निवेदन देत, मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. याबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी नुकतीच ग्रामस्थ, एमआयडीसी अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अधिकारी यांच्यासोबत संयुक्त बैठक घेतली. या बैठकीत ग्रामस्थांनी अधिकृत नळ कनेक्शनमुळे गावांना पाणी पुरवठा होत नसल्याचे सांगितले. यावेळी एमआयडीसी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनीही अनधिकृत नळ कनेक्शन असल्याचे मान्य केले. याबाबत डॉ. भरत बास्टेवाड यांनी योजनेवरील अनधिकृत नळ कनेक्शन काढण्याच्या सूचना एमआयडीसी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाला दिले.

रोहा तालुक्यातील २६ गावातील सुरळीत पाणी पुरवठा होत नसल्याबाबत ग्रामस्थांनी निवेदन देत, मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता. या प्रश्नाबाबत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी जिल्हा परिषदेत एक बैठक आयोजित केली होती. या बैठकीला जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभाग कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी खान यांच्यासह २६ गाव नागरिकांचे शिष्टमंडळ, एमआयडीसी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत २६ गाव पाणी पुरवठा योजना २००८ मध्ये मंजूर करण्यात आली. योजनेत उजवा तीर पडम ते धोंडखार १४ गावे व डावा तीर खारगाव ते कोकबन १२ गावांचा समावेश आहे. २०१३-२०१४ मध्ये पाणीपुरवठा सुरू झाला, मात्र यामध्ये योजनेत समाविष्ट गावे सोडून आधी येणार्या गावांमधील काही खासगी मालमत्ताधारकांकडून अनधिकृतपणे कनेक्शन घेतले. यामुळे योजनेत समाविष्ट गावांना अपुरा पाणीपुरवठा होत आहे. २०२२-२०२३ मध्ये येथे जलजीवन मिशन योजनेअंतर्गत कामे हाती घेण्यात आली आहेत. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून जल जीवन मिशन अंतर्गत हाती घेण्यात आलेली कामे बहुतांश पूर्ण होत आली आहेत, मात्र अनधिकृत नळ कनेक्शन मुळे गावांना अपुरा पाणी पुरवठा होत असल्याची बाब ग्रामस्थांनी मांडली, तसेच संबंधित अनधिकृत नळ कनेक्शन हटविण्याची मागणी डॉ. भरत बास्टेवाड यांच्याकडे केली. एमआयडीसी व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकार्यांनी येथे अनधिकृत नळ कनेक्शन असल्याचे मान्य केले.

यावेळी संबंधित अनधिकृत नळ कनेक्शन हटविण्याच्या सूचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या तसेच या योजनेची कामे पूर्ण झाली असल्याने अनधिकृत नळ कनेक्शन हटविल्यानंतर संबंधित योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करून घेण्यात येणार आहे. योजना हस्तांतरित करण्यासाठी शिखर समिती स्थापन करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. या व्यतिरिक्त संबंधित गावांमध्ये सध्या पाणी टंचाई असल्यास टँकरने पाणी पुरवठा करण्याच्या सुचना दिल्या. असे अनधिकृत नळ कनेक्शन इतरही गावांमध्य आहेत. त्याबाबत तक्रारी येण्याची वाट नपाहता प्रशासनाने धडक कारवई केली करायला हवी. ही अनधिकृत नळकनक्शन काढून टाकली तरी अनेक गावांमधील पाणीपुरवठ्याचा प्रश्न सुटेल.

## बदलते तंत्रज्ञान



# आता जेमिनी घेणार गुगल असिस्टंटची जागा

गुगल असिस्टंटने लाखो स्मार्ट डिव्हाइस युजर्सचे जीवन सोपे केले आहे. हे युजर्सना हँड्सफ्री पद्धतीने अनेक कामे करण्याची मोकळीक देते, ज्यामुळे दैनंदिन कामे करणे सोपे होते. या कामांमध्ये रोबोट व्हॅक्यूम क्लिनर नियंत्रित करणे, दिवे बंद करणे यासारख्या दैनंदिन कामांचा समावेश होतो, पण आता गूगलने सर्व युजर्सना धक्का दिला आहे. गुगल असिस्टंटची जागा आता जेमिनी घेणार आहे.





२०१६मध्ये अँड्रॉइडसाठी लाँच केलेला डिजिटल असिस्टंट, 'गुगल असिस्टंट' लवकरच गुगल ग्रेव्हयार्डमध्ये सामील होणार आहे. एका ब्लॉग पोस्टमध्ये गुगलने जाहीर केले की, जवळजवळ अनेक दशक जुने डिजिटल असिस्टंट लवकरच जनरेटिव्ह एआय पॉवर्ड जेमिनीमध्ये बदलले (रिप्लेस) जाईल.

टेक जायंट म्हणतात की, लाखो लोकांनी आधीच गुगल असिस्टंटवरून जेमिनीमध्ये स्विच केले आहे. त्यामुळे हे बघता या वर्षाच्या अखेरीस जुना डिजिटल असिस्टंट तुमच्या मोबाइल डिव्हाइसवर डाउनलोड करण्यासाठी उपलब्ध नसेल. स्मार्टफोन्स व्यतिरिक्त, टॅब्लेट, कार, हेडफोन्स आणि स्मार्टवॉच सारखी उपकरणेदेखील जेमिनीमध्ये बदलली जातील . जोपर्यंत हा बदल होत नाही तोपर्यंत, ही उपकरणे गुगल असिस्टंटसह काम करत राहतील, पण कंपनीने अद्याप या उपकरणांवर जेमिनी कसे काम करेल याबद्दल कोणतीही माहिती शेअर केली नाही.

जर तुम्ही अजूनही गुगल असिस्टंटवरून जेमिनीवर स्विच केले नसेल, तर फक्त गुगल प्ले स्टोअर वरून जेमिनी ॲप डाउनलोड करा. काही टॅप्समध्ये तुम्ही नवीन एआय पॉवर्ड असिस्टंटवर स्विच करू शकाल. गेल्या काही महिन्यांत गुगलने जेमिनीमध्ये अनेक असिस्टंट फीचर्स पोर्ट केले आहेत. जसे की, म्युजिक प्ले करण्याची क्षमता, लॉक स्क्रीनवरून काही फंक्शन नियंत्रित करणे आणि टायमर सेट करणे आदी.

काही निवडक फंक्शन अद्याप जेमिनीमध्ये नाही आहेत, ज्यामुळे गुगलला त्यांचे जुने डिजिटल असिस्टंट बंद करण्यासाठी काही महिने लागतील हे एक कारण असू शकते. जेमिनीच्या बाजूने गुगल असिस्टंट बंद करण्याची कंपनीची घोषणा आश्चर्यकारक नाही, कारण टेक जायंटने पिक्सेल ९ सिरीजसह जेमिनी डीफॉल्ट व्हर्च्युअल असिस्टंट म्हणून लाँच केली आहे.

# ख्यातनाम सनईवादक बिस्मिल्लाखाँ



**निमित्त**

अखिल भारतीय कीर्तीचे सुप्रसिद्ध सनईवादक व भारतरत्न पुरस्काराचे मानकरी अशी ओळख बिस्मिल्लाखाँ यांची राहिलेली आहे. त्यांचे मूळ नाव कमरूद्दिनखाँ. बिस्मिल्लाखाँ यांचा जन्म २१ मार्च १९१६ रोजी सनईवादकांच्या कुटुंबात बिहार प्रांतातील शहाबाद जिल्ह्यातील (आता बक्सर जिल्हा) दुमराव या गावात झाला. त्यांचे आजोबा रसूल बक्ष हे दुमरावच्या दरबारी सनईवादक म्हणून नोकरीस होते. सनईवादन हा त्यांच्या घराण्याचा कौटुंबिक व्यवसाय असल्यामुळे लहानपणीच त्यांना आपल्या वडिलांकडून खाँसाहेब पैगंबरबक्ष यांच्याकडून सनईवादनाचे संस्कार लाभले. त्यांनी आपल्या मामांकडे खाँसाहेब अलिबक्ष यांच्याकडे वयाच्या सहाव्या वर्षापासून वाराणसी येथे सनईवादनाचे पद्धतशीर शिक्षण घेण्यास सुरुवात केली तसेच विलायत हुसेन आणि सादिक अली यांच्याकडेही त्यांनी संगीताचे धडे घेतले.

बिस्मिल्लाखाँ हळूहळू आपल्या मामांबरोबर साथ करण्यासाठी लग्न तसेच संगीत संमेलनात जाऊ लागले. त्यांनी मामांबरोबर वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी अलाहाबादच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत पहिल्यांदा सनई वादनाचा सार्वजनिक कार्यक्रम केला (१९३०). दुसरा कार्यक्रम लखनौ येथे प्रदर्शनानिमित्त झालेल्या संगीत संमेलनात करून उत्तम वादनाबद्दल सुवर्णपदक मिळवले. तद्वतच १९३७मधील कोलकात्याच्या अखिल भारतीय संगीत परिषदेत त्यांनी तीन सुवर्णपदके मिळवून रसिकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. १९३८मध्ये लखनौ येथे ऑल इंडिया रेडिओ केंद्रावर प्रथम कार्यक्रम सादर केला. येथून पुढे त्यांच्या सनई वादनाच्या उज्ज्वल कारकीर्दीला सुरुवात झाली. १९४० साली बिस्मिल्लाखाँ व त्यांचे बंधू खाँसाहेब शमसुद्दीनखाँ यांनी एक संगीत मंडळी स्थापन करून कार्यक्रम सादर करण्यास सुरुवात केली. पुढे अल्पावधीतच प्रथम श्रेणीचे सनईवादक म्हणून त्यांनी लौकिक संपादन केला. या दरम्यान कन्नड अभिनेते राजकुमार यांच्या सनादी अप्पण्णा या चित्रपटासाठी त्यांनी सनईवादन केले. सत्यजित राय यांच्या जलसाघर या चित्रपटात त्यांनी भूमिका साकारली.

बिस्मिल्लाखाँ यांच्या असामान्य कलागुणांमुळे १९५५मध्ये त्यांना नॅशनल कल्चरल ऑर्गनायझेशन या राष्ट्रीय सांस्कृतिक संघटनेकडून अखिल भारतीय शहनाई चक्रवर्ती हा किताब मिळाला. १९५६मध्ये संगीत नाटक अकादमीतर्फे सन्मान लाभला आणि १९६१मध्ये भारत सरकारकडून पद्मश्री, १९६८मध्ये पद्मभूषण आणि १९८०मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी त्यांना गौरविण्यात आले. मध्य प्रदेश शासनाकडून तानसेन पुरस्काराने त्यांचा सन्मान करण्यात आला. रॉयल नेपाळ आर्ट अकॅडमीतर्फेही त्यांना सर्वोच्च मान लाभला. २००१मध्ये भारत सरकारने सनई वादनातील त्यांच्या अद्वितीय कामगिरीकरिता भारतरत्न या सर्वोच्च पुरस्काराने त्यांना गौरविले.

बिस्मिल्लाखाँ यांनी देश विदेशात अनेक ठिकाणी सनईवादनाचे कार्यक्रम केले. त्यांच्या सनईवादनाच्या ध्वनिमुद्रिका भारतात व परदेशांतही अत्यंत लोकप्रिय आहेत. गूंज उठी शहनाई या हिंदी चित्रपटातील त्यांचे सनईवादनही फार लोकप्रिय ठरले. स्वदेस या हिंदी चित्रपटासाठी देखील त्यांनी सनईवादन केलेले आहे. बिस्मिल्लाखाँ यांचा २१ ऑगस्ट २००६ रोजी वाराणसी येथे हृदयविकाराने मृत्यू झाला. (साभार : मराठी विश्वकोष)

**बातमीतील बात**




## आरोग्य प्रहर

# 'हा' त्रास असणाऱ्या व्यक्तींनी डोक्याला तेल लावणे टाळावे!

काही जण असे असतात की आठवड्यातून एकदा तरी डोक्याला मस्तपैकी तेल लावून मालिश केल्याशिवाय त्यांचं होत नाही. तेल लावून डोक्याला मालिश केलं की त्यांना एकदम शांत, रिलॅक्स वाटू लागतं, पण हे फिलिंग तेवढ्यापुरतंच असू शकतं, कारण आयुर्वेद डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार काही व्यक्ती अशा आहेत ज्यांच्या प्रकृतीला तेल लावून डोक्याला मालिश करणं अजिबातच शक्य नसतं याविषयीच डॉक्टर नेमकं काय सांगत आहेत कोणासाठी तेल लावणं फायद्याचं असतं आणि कोणासाठी ते त्रासदायक ठरू शकतं हे एकदा पाहूया..



डोक्याला तेल लावून मालिश केल्यामुळे कोणत्या प्रकृतीच्या लोकांना त्रास होऊ शकतो, याविषयी माहिती सांगणारा व्हिडिओ डॉक्टरांनी drmanasimehendale.dhamankar या इन्स्टाग्राम पेजवर शेअर केला आहे.

यामध्ये डॉक्टर सांगत आहेत की, ज्या व्यक्तींच्या नाकातून, डोळ्यातून सतत पाणी येत आहे, ज्या व्यक्तींच्या कानामध्ये पू झाला आहे अशा व्यक्तींनी डोक्याला तेल लावणं टाळायला हवं. असा त्रास होणाऱ्या व्यक्तींच्या शरीरातला कफ वाढलेला असतो. तेल लावल्याने तो अधिक वाढू शकतो. त्यामुळे हा त्रास असेपर्यंत डोक्याला तेल लावून मालिश करू नका, असं डॉक्टर सांगतात..

याचप्रमाणे ज्या व्यक्तींना आमवाताचा त्रास होतो म्हणजेच अंगावर नेहमीच सूज येत असते अशा व्यक्तींनीही डोक्याला तेल लावून मालिश करणं टाळायला हवं.

कारण यामुळे त्यांच्या अंगावरची सूज जास्त वाढू शकते. यामध्ये डॉक्टरांनी असंही नमूद केलं आहे की असे सगळे त्रास होत असतील तर आधी तुमच्या जवळच्या वैद्यांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच तेल लावायचं की नाही हे ठरवा.

हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

# रायगड प्राधिकरणचा निधी योग्य कामासाठी वापरा

## राजमाता जिजाऊ राजवाडा आणि समाधीचे संवर्धन करण्याची आमदार प्रवीण दरेकरांची मागणी

**महाड : प्रतिनिधी**

किल्ले रायगड प्राधिकरण च्या माध्यमातून होणारी विकास कामे नक्की कोणती व कोणत्या प्राधान्याने होत आहेत? कोट्यवधींचा निधी जर राज्य सरकार रायगड प्राधिकरण ला देत असेल तर राजमाता जिजाऊंचा ऐतिहासिक राजवाडा व समाधी आजपर्यंत उपेक्षित का? असा सवाल करीत आमदार प्रवीण दरेकर यांनी सभागृहात रायगड प्राधिकरणवर शंका उपस्थित केली आहे.





विधानपरिषद सभागृहात आमदार मिलींद नारवेकर यांनी आमदार दरेकर यांचे गाव असलेल्या महाड येथील राजमाता जिजाऊंच्या राजवाड्याची दुरावस्था झालेली असल्याचा तारांकीत प्रश्न उपस्थित केला. याच प्रश्नावर उप प्रश्न विचारीत आ प्रविण देरेकर यांनी संपुर्ण रायगड प्राधिकरण च्या कामांवरच शंका उपस्थित केली. राज्य सरकार रायगड प्राधिकरण साठी ६०० कोटींच्या निधीची तरतूद करत असते, मात्र हा निधी प्राधान्याने करावयाच्या कामांसाठी खर्च नकरता नको तिथे खर्च होत आहे. खरतर एवढ्या निधीमधून राजमाता जिजाऊ यांच्या राजवाड्याचे उत्तम संवर्धन झाले असते.

यासोबतच एक सुंदर व महाराष्ट्राला गौरव वाटेल असे जिजाऊंचे स्मारक आणि समाधीचे सुशोभीकरण करता आले असते, मात्र तसे झाले नसल्याची खंत व्यक्त करीत आमदार दरेकर यांनी रायगड प्राधिकरण वर सवाल उपस्थित करत चौकशीची मागणी केली आहे. आ प्रविण दरेकर यांच्या या मागणीचे महाड सह रायगड खोर्यातील नागरीक व शिवप्रेमींनी समर्थन केले असुन छत्रपती संभाजी राजेंच्या या भ्रष्ट कारभारातून रायगड प्राधिकरणची मुक्तता करावी, अशी मागणी आता स्थानिकांकडून होऊ लागली आहे.

---

## वाहतूकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग** : वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करून बेदरकारपणे वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे.

जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतूक शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बुधवारी (दि.१९) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण १४३ वाहनचालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात आली. पोलिसांनी या वाहनचालकांकडून एक लाख ४६ हजार २५० रुपये इतका दंड आकारला आहे. वाहतूक पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे वाहनचालकांचे धाबे दणाणले आहेत.

---

# पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९ उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

## जाहिर सूचना

Selection of well experienced & qualified agency for Real Time Ambient Air Quality Monitor and Display Board one years warranty and annual Maintenance for a period of four years in Panvel Municipal corporation, Maharashtra, India. **बाबींकरीता ई निविदा मागविण्यात येत आहेत.**

| अनु.क्र. | कामाचे नाव | नग | दर (GST सह व सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | Selection of well experienced & qualified agency for Real Time Ambient Air Quality Monitor and Display Board one years warranty and annual Maintenance for a period of four years in Panvel Municipal corporation, Maharashtra, India. | ०७ | |

या निविदेबाबतची माहिती शासनाच्या WWW Mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २१/०३/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध होईल. इच्छुक निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ११४/११४/२०२५**
**दिनांक :- २०/०३/२०२५**

---

# माथेरान गिरीस्थान नगरपरिषद

**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा- रायगड. ४१० १०२**
**ई-मेल आयडी :** mcomatheran@gmail.com

**जावक क्र. मागिनप: ६४९ : २०२४-२५** **दिनांक: २०/०३/२०२५**

मा. सर्वोच्च न्यायालय यांचेकडील Writ Petition (s) (Civil) No. (s)-202-1995 **मधील** I.A. Nos 79569 And 79576-2019, I.A. Nos 159670 And 159677-2019, I.A.D Nos. 14261 And 14262-2021, I.A. Nos 40599, 40624-2023 And 220675-2023 **चे दिनांक १५.०४.२०२४ रोजीच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे निर्देश आहे.**

**मुद्दा क्र. ३:-** Until further orders, we permit the number of E rickshaws to be limited to 20.

**मुद्दा क्र. ४:-** We further permit the e-rickshaw owners, who were earlier handcart pullers, to use the same for transporting the tourists and the local population.

आणि उपरोक्त याचिकेबाबत दिनांक २४.०७.२०२४ रोजीच्या आदेशानुसार निर्देश खालीलप्रमाणे आहे.

**मुद्दा क्र. २:-** We had also directed that there should be restriction on the number of e-rickshaws vide order dated 15th -pril, 2024, we had restricted the number of e-rickshaws limited to 20. We have further clarified that the e-rickshaws should be permitted only if they are allotted to the earlier handcart pullers.

आणि उपरोक्त याचिकेबाबत दिनांक २०.०२.२०२५ रोजीच्या आदेशानुसार खालीलप्रमाणे निर्देश आहे.

**मुद्दा क्र. ५:-** As prayed, we grant two weeks' time to the State Government to come out with a proposal for revising the process of allotment of e-rickshaws.

वरील निर्देशास अनुसरून मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुगार या पूर्वीचे स्वतः हातरिक्षा ओढणारे **(earlier handcart pullers)** व्यक्तींकडून २० ई-रिक्षा चालविण्यासाठी दिनांक २१/०३/२०२५ सकाळी ११ वा. पासून दिनांक २५/०३/२०२५ सायं. ६ वा. पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज स्वीकारण्यासाठी दिनांक २२/०३/२०२५ आणि २३/०३/२०२५ रोजी सुट्टीच्या दिवशी देखील माथेरान गिरीस्थान नगरपरिषद कार्यालय सुरु राहील.

**अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे,** १) हात रिक्षा परवाना, २) ई-रिक्षा परवाना, ३) ड्रायव्हिंग लायसन्स (तीन चाकी), ४) आधारकार्ड, ५) पॅनकार्ड, ६) सत्यप्रतिज्ञापत्र

**टीप :-**१) वरील सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती ह्या साक्षांकित केलेली असावीत.
२) पात्र हातरिक्षा परवाना धारकाची निवड ही मुळ कागदपत्रांच्या पडताळणीच्या अधीन राहून करणेत येईल. सादर केलेल्या अर्जाबाबत सक्षम प्राधिकरणांमार्फत अभिप्राय प्राप्त करून घेण्यात येणार आहे, याची नोंद घ्यावी. उपरोक्त नमूद कागदपत्रामध्ये काही कमतरता असल्यास किंय काही कागदपत्रे विहित मुदतीत उपलब्ध नसल्यास त्याबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिका राखून ठेवण्यात आला आहे.
३) निवडीच्या कोणत्याही टप्यात किंवा निवड झाले नंतर सादर केलेल्या कागदपत्रांबाबत खोटेपणा सिध्द झाल्यास/ आढळल्यास निवड रद्द करणेत येईल.
४) हातरिक्षा परवाना धारकाने मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.
५) हातरिक्षा परवाना धारकांना महाराष्ट्र शासनाने ठरविलेल्या अटी-शर्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.
६) जाहीर सुचनेतील मा. सर्वोच्च न्यायालयाचे आदेशाचे संदर्भ विचारात घेता स्वतः हातरिक्षा ओढणारे (earlier handcart pullers) व्यक्तींनीच अर्ज सादर घ्यावे.
७) सदरील ई-रिक्षा बाटप प्रकरणी शासनाचा निर्णय अंतिम राहील.
८) संपर्कासाठी मोबाईल नंबर : १) ९४२११५८३५८, २) ७३७८७७३००६

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**

**सही/-**
**उपविभागीय अधिकारी**
**उपविभाग, कर्जत**

---

# ग्रामपंचायत पांगळोली

**मु.पो, पांगळोली ता. म्हसळा, जि. रायगड**

| अ. क्र. | कामाचे नाव | वर्ष | रक्कम | अनुदान प्रकार | १% इशारा | निविदा फी | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मोमीन मोहल्ला पाईपलाईन | २०२०-२१ | १०००००/- | १५ वित्त आ | १०००/- | १००/- | ३ महिने |
| २ | बौद्धवाडी विहीर दुरुस्ती | २०२१-२२ | २४०००/- | १५ वित्त आ | २४०/- | १००/- | ३ महिने |
| ३ | शामिल मोहल्ला आणि मोमीन मोहल्ला पाईपलाईन | २०२२-२३ | १५००००/- | १५ वित्त आ | १५००/- | १००/- | ३ महिने |
| ४ | मोमीन मोहल्ला पाण्याची टाकी दुरुस्ती करणे | २०२४-२५ | १३२३९०/- | १५ वित्त आ | १३२४/- | १००/- | ३ महिने |
| ५ | मोमीन व मजिद मोहल्ला पाईपलाईन | २०२१-२२ | ६७०००/- | १५ वित्त आ | ६७०/- | १००/- | ३ महिने |
| ६ | शामिल मोहल्ला विहीर दुरुस्ती | २०२१-२२ | २४०००/- | १५ वित्त आ | २४०/- | १००/- | ३ महिने |
| ७ | पांगळोली पठाणवाडी विहीर दुरुस्ती | २०२४-२५ | १२००००/- | १५ वित्त आ | १२००/- | १००/- | ३ महिने |
| ८ | कुणबीवाडी येथे पाण्याची टाकी बसविणे | २०२०-२१ | ५००००/- | १५ वित्त आ | ५००/- | १००/- | ३ महिने |
| ९ | कुणबीवाडी येथे पाणी पुरवठा सुधारणा करणे | २०२२-२३ | २०६७३/- | १५ वित्त आ | २०६/- | १००/- | ३ महिने |
| १० | बौद्धवाडी विहीर परिसर व सुशोभिकरण | २०२०-२१ | ३१७३९/- | १५ वित्त आ | ३१७/- | १००/- | ३ महिने |
| ११ | हुसनमिया वस्ता ते अब्दुल रझाक धनसे गटार बांधणे | २०२४-२५ | २५२३९०/- | १५ वित्त आ | २५२४/- | १००/- | ३ महिने |
| १२ | उर्दू शाळा कलर करणे | २०२०-२१ | ५००००/- | १५ वित्त आ | ५००/- | १००/- | ३ महिने |
| १३ | मोमीन मोहल्ला येथे गटार दुरुस्ती करणे | २०२२-२३ | १४००००/- | १५ वित्त आ | १४००/- | १००/- | ३ महिने |
| १४ | पांगळोली गावातील बस थांबा रंगविणे | २०२१-२२ | ४००००/- | १५ वित्त आ | ४००/- | १००/- | ३ महिने |
| १५ | रा.जि.प. शाळा मुलींच्या स्वच्छतागृहाची दुरुस्ती | २०२१-२२ | २००००/- | १५ वित्त आ | २००/- | १००/- | ३ महिने |
| १६ | बौद्धवाडी अंतर्गत रस्ता पेव्हर ब्लॉक करणे | २०२४-२५ | १६०५३०/- | १५ वित्त आ | १६५४/- | १००/- | ३ महिने |
| १७ | कुणबीवाडी रा.जि.प. शाळा दुरुस्ती करणे | २०२४-२५ | ७५७१३/- | १५ वित्त आ | ७५७/- | १००/- | ३ महिने |
| १८ | जि.प. उर्दू व मराठी शाळा डिजिटल करणे | २०२१-२२ | ४००००/- | १५ वित्त आ | ४००/- | १००/- | ३ महिने |
| १९ | अंगणवाड्यांना साहित्य खरेदी करणे | २०२०-२१ | २४६२८/- | १५ वित्त आ | २४६/- | १००/- | ३ महिने |
| २० | शामीन मोहल्ला गटार बांधणे | २०२२-२३ | ७००००/- | १५ वित्त आ | ७००/- | १००/- | ३ महिने |
| २१ | जि.प शाळा डिजिटल करणे | २०२०-२१ | ३९२४१/- | १५ वित्त आ | ३९२/- | १००/- | ३ महिने |

**अटी शर्ती :-**
१. सिलबंद निविदा दिनांक २१/०३/२०२५ ते दि. २७/०३/२०२५ या कालावधी पर्यंत सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावी.
२. प्राप्त निविदा २९/०३/२०२५ च्या मासिक सभेत उघडण्यात येतील.
३. निविदा सादर करताना ठेकेदाराने प्रत्येक कामाची १% इशारा रक्कम भरणा केल्याशिवाय निविदा स्विकारल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.
४. मुदतीत न आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५. कोणतीही एक अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा पुन्हा निविदा मागविण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला राहील.
६. काम पूर्ण झाल्यावर एक वर्ष विनामुल्य देखभाल करण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

**दिनांक :- २०/०३/२०२५**

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत पांगळोली**
**ता. म्हसळा, जि. रायगड**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत पांगळोली**
**ता. म्हसळा, जि. रायगड**

---

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ८१/२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ०४/०३/२०२५ रोजी दैनिक मुंबई चौफेर, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती... महाड औद्योगिक क्षेत्रातील अशुद्ध व शुद्ध जल उदंचन केंद्रामध्ये रिंग मेन युनिटचा पुरवठा करणे, उभारणे व कार्यान्वित करणे . | ₹ ३२,७९,७७३.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०१/०४/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

---

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधिताना भूखंडाचे **करारनामा /वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./ हिस्सा क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता (चौ.मी.) | वाटपपत्र देण्यात/करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | भूखंडाच्या वाटपाशी/करारनाम्याशी संबंधित भूधारक व त्यांच्या कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहितीनुसार वाटपाशी / संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | | |
| १ | उलवे ९८३ | वहाळ ४७२ | १६५/२<br>१६५/३ | ०-१२-०<br>०-०-६ | अल्पभूधारक म्हणून प्रत्येकी ४० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. १६२F, सेक्टर १९, क्षेत्र- ४० चौ.मी. | **कै. गिरिजाबाई महादू म्हात्रे (मयत) यांचे वारस**<br>श्रीमती मंजुळाबाई रोहिदास मढवी | -- |
| **नोड- द्रोणागिरी** | | | | | | | | |
| २ | २४३ | वाल्टीखार ९ १/८६<br><br>मुठेखार ७/८६ | ३५/२<br>४/४अ<br>४/४ब<br>१४/१+२ +३+४अ<br>एकूण संपादित क्षेत्र | ०-०६-३<br>०-०८-५<br>०-०८-५<br>०-३६-०<br>५-९३-० | ५०० चौ.मी. | द्रोणागिरी भूखंड क्र. ३०अ, सेक्टर-५४, क्षेत्र ५०० चौ.मी. | **१) कै. शंकर शांतु पाटील (मयत) यांचे वारस**<br>१:१) नामदेव शंकर पाटील<br>१:२) चंद्रकांत शंकर पाटील<br>१:३) महेश शंकर पाटील<br>१:४) कृष्णा शंकर पाटील<br>१:५) गणुबाई अनंत कडू गणूबाई अनंत पाटील<br>१:६) शानुबाई जयराम ठाकूर<br>१:७) बानुबाई लक्ष्मण ठाकूर<br>**२) गोकूळ शांतु पाटील (मयत) यांचे वारस**<br>२:१) लाडकुबाई गोकुळ पाटील<br>२:२) ज्ञानेश्वर गोकुळ पाटील<br>**३) दत्तु शांतु पाटील (मयत) तसेच विठाबाई दत्तु**<br>पाटील यांचे वारस<br>३:१) गुरूनाथ दत्तु पाटील<br>३:२) राम दत्तु पाटील<br>३:३) मंदा बाबुराव मढवी<br>३:४) जयश्री विजय मुंबईकर | निरंक |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसाच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निर्दशनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करुन वाटपपत्र करुन देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेतली जाणार नाही, याची संबंधितानी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर,
नवी मुंबई ४०० ६१४.

**अति.मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**
**सिडको/जनसंपर्क/५०२/२०२४-२५**

# नवी मुंबईत स्वच्छतेकडे विशेष लक्ष

## सायन-पनवेल महामार्ग, रेल्वे स्थानकांवर मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

शहराची ओळख प्रामुख्याने स्वच्छ व सुंदर शहर असून यामध्ये नागरिकांच्या सहभागाचा मोठा वाटा आहे. नवी मुंबई महापालिका शहर स्वच्छतेला विशेष प्राधान्य देत असते.

महापालिका क्षेत्रातील मुख्य रस्त्यांमध्ये सायन पनवेल महामार्ग हा महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असून या महामार्गावर जड वाहनांची कायम वर्दळ असते. त्याचप्रमाणे जेएनपीटीकडे जाण्यासाठीही या रस्त्यावरुनच वाहतूक होते. त्यामध्ये बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या जड वाहनांचाही समावेश होतो. त्यामुळे या रस्त्याची नियमित स्वच्छता हे एक आव्हान आहे.

यादृष्टीने महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे या महामार्गाच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष असून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली या महामार्गाच्या दुतर्फा सातत्याने सखोल स्वच्छता मोहीमा आयोजित करण्यात येत असतात. येथील सातत्यपूर्ण स्वच्छतेबाबत आयुक्तांनी आढावा बैठकीत महानगरपालिकेच्या वतीने विशेष पथक गठीत करण्याचे निर्देश दिले असून या पथकाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत नियमित संपर्कात राहून सायन पनवेल महामार्गावरील स्वच्छतेकडे



बारकाईने लक्ष देण्याचे व नियमित स्वच्छ राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले आहेत.

अशाच प्रकारे नवी मुंबईतील १२ रेल्वे स्थानके व परिसर येथील स्वच्छतेची जबाबदारी सिडको महामंडळाकडे असून सर्व रेल्वे स्थानके मोठया प्रमाणात वर्दळीची ठिकाणे आहेत. महामार्ग स्वच्छतेसाठी नियुक्त केलेल्या पथकाने सिडकोच्या अखत्यारितील रेल्वे स्थानकांच्या स्वच्छतेकडेही बारकाईने लक्ष द्यावयाचे असून या कामी सिडकोच्या संबधित अधिकाऱ्यांशी नियमित संपर्कात राहून हे काम करुन घ्यावयाचे आहे असे आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले आहे.

नवी मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये पूर्वेकडील बाजूस मोठया प्रमाणात एमआयडीसी क्षेत्र असून त्याठिकाणच्या स्वच्छतेकडेही प्राधान्याने लक्ष देण्याचे आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आलेले आहेत. एमआयडीसी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात दुर्लक्षित जागा असून अशा ठिकाणी रात्रीच्या वेळी डेब्रीज आणून टाकण्याचे प्रकार अनेकदा घडताना दिसतात. डेब्रीजमुळे शहर स्वच्छतेला बाधा पोहचते हे लक्षात घेवुन डेब्रीज विरोधी पथकांना अधिक सक्रिय करावे व एमआयडीसी अधिकाऱ्यांच्या सहकार्याने एमआयडीसी परिसरही स्वच्छ राहील याकडे विशेष लक्ष देण्याचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी निर्देशित केले आहे.

**पालिका आयुक्तांचे स्पष्ट निर्देश**

स्वच्छ नवी मुंबईसाठी संबधित सर्व प्राधिकरणांचे सक्रिय सहकार्य अपेक्षित असून त्यादृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभाग, सिडको, रेल्वे, एमआयडीसी अशा सर्व संबधित प्राधिकरणांशी सातत्यपूर्ण समन्वय ठेवून बारकाईने लक्ष देत नियमित काम करावे, असे स्पष्ट निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले.

## कोपरखैरणेमध्ये पालिकेची प्लास्टिकविरोधी कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

- १० हजारांची दंडवसूली
- २.५ किलो प्लास्टिक पिशव्या जप्त

प्लास्टिक पिशव्या तसेच एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर थांबविण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका व्यापक प्रमाणावर जनजागृती करीत आहे, त्यासोबतच बाजारपेठांमध्ये पाहणी मोहीमा राबविण्यात येत आहेत. या अंतर्गत परिमंडळ २ च्या भरारी पथकाने १७ मार्च रोजी कोपरखैरणे सेक्टर १४ येथील महावीर फालुदा या व्यावसायिकाकडून एक किलो प्लास्टिक पिशव्यांचा साठा जप्त करीत पाच हजार रक्कमेची दंडवसूली करण्यात आली. त्याचप्रमाणे १८ मार्च रोजी सेक्टर १४, कोपरखैरणे येथील फ्रेंड सर्कल दुकानात प्लास्टिक पिशव्यांचा वापर आढळल्याने त्यांच्याकडून पाच हजार दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली व १.५ किलो प्रतिबंधात्मक प्लास्टिक साठा जप्त करण्यात आला.

प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला व मानवी जीवनाला पोहचणारी हानी लक्षात घेता नागरिकांनी जागरूक होऊन प्लास्टिक पिशव्यांना वापरातून हद्दपार करावे व कापडी पिशव्यांचा अंगिकार करावा असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात येत असून कागदी पिशव्यांचा वापर थांबविण्यासाठी तपासणी मोहीमाही राबविण्यात येत आहेत.

## महावितरणच्या प्रकाशगडावरील सौरऊर्जा प्रणालीचे उद्घाटन



**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या प्रकाशगड मुख्यालयाच्या प्रशासकीय इमारतीच्या छतावरील सौरऊर्जा प्रणालीचे उद्घाटन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. महावितरणचे प्रकाशगड मुख्यालय हे आता सौरऊर्जेद्वारे प्रकाशमान झाले आहे. प्रकाशगड मुख्यालयाची दैनंदिन विजेची गरज भागविण्यासाठी २८० किलो वॅट क्षमतेची सौरऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यात आली आहे.

महावितरणकडून पर्यावरणपूरक सौर ऊर्जेच्या वापरास प्रोत्साहन दिले जात आहे. शेती सिंचनासाठी दिवसा वीज उपलब्ध व्हावी याकरिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० राबविण्यात येत आहे. मागेल त्याला सौर कृषी पंप योजनेतून शेतकऱ्यांना मोफत विजेसाठी सौर कृषी पंप उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेतून घरगुती ग्राहकांना घराच्या छतावर सौर प्रकल्प उभारून विजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी प्रोत्साहित केले जात आहे. राज्यातील १०० गावे सौरग्राम अर्थात १०० टक्के सौरउर्जेवर आणण्यासाठी सौरग्राम योजना राबविण्यात येत आहे. एकंदरीत हरित ऊर्जेचा वापर वाढविण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून चालना देण्यात येत आहे.

सौर ऊर्जा प्रणालीच्या उद्घाटनावेळी संचालक अरविंद भादिकर (संचालन तथा मानव संसाधन), प्रसाद रेशमे (प्रकल्प), अनुदीप दिघे (वित्त), योगेश गडकरी (वाणिज्य), कार्यकारी संचालक (प्रकल्प) धनंजय औंढेकर, प्रादेशिक संचालक परेश भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती. कंत्राटदार मे टेक फोर्स सर्व्हिसेस नागपूर यांनी या प्रकल्पाची उभारणी केली आहे.

## केएलई कॉलेजमध्ये राष्ट्रीय कायदा महोत्सव आणि आंतरराष्ट्रीय परिसंवाद

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील केएलई सोसायटीच्या केएलई कॉलेज ऑफ लॉतर्फे राष्ट्रीय कायदा महोत्सव स्पार्कल ६.० चे आयोजन २२ मार्च रोजी करण्यात आले आहे. या महोत्सवात मूट कोर्ट स्पर्धा आणि क्लायंट कौन्सिलिंग स्पर्धा या दोन प्रमुख राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

या स्पर्धेला देशभरातून प्रचंड प्रतिसाद मिळत असून ३० टीम यात सहभागी होणार आहेत. स्पर्धेच्या प्राथमिक आणि ऑक्टा-फायनल फेरी ७ व ८ मार्च २०२५ रोजी ऑनलाइन स्वरूपात पार पडल्या, जिथे देशभरातील नामवंत कायदेतज्ज्ञ आणि न्यायमूर्तींनी परीक्षक म्हणून काम



पाहिले. आता सर्वांचे लक्ष २१ व २२ मार्च रोजी केएलई कॉलेज ऑफ लॉ, कळंबोली येथे होणाऱ्या उपांत्य व अंतिम फेरींवर लागल्या आहेत. यावेळी अरविंद कुमार (न्यायाधीश, सर्वोच्च न्यायालय), पी.एस. दिनेश कुमार ( माजी मुख्य न्यायाधीश, कर्नाटक), मिलिंद जाधव (न्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय), डॉ. सोमू सी.एस. (प्राध्यापक) डॉ. प्रभाकर कोरे (चेअरमन, केएलई सोसायटी, बेळगावी) प्रमुख पाहुणे आणि वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यांची अभ्यासपूर्ण भाषणे आणि सखोल मूल्यांकन ऐकण्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन प्रिन्सिपल दिनकर गीते यांनी केले आहे.

सार्क देशांमध्ये न्याय वितरण प्रणालीवरील आंतरराष्ट्रीय परिसंवाद २४ मार्च रोजी दुपारी २ वाजता कळंबोली, केएलई कॉलेज ऑफ लॉ येथे आयोजित केला आहे. या परिसंवादात भारत आणि श्रीलंकेतील पाहुणे सार्क राष्ट्रांमधील न्याय वितरण प्रणालीवर चर्चा करणार आहेत. या परिसंवादाचा उद्देश सार्क प्रदेशातील कायदेशीर तज्ञांमध्ये संवाद आणि सहकार्य वाढवणे आहे, श्रीलंकेच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश ए.एच.एम. डी. नवाज, आयआययूएलईआर, गोव्याचे कुलगुरू प्रा. (डॉ.) आर. वेंकटराव आणि ॲमिटी युनिव्हर्सिटी, मुंबईच्या लॉ स्कूलचे संचालक प्रा. डॉ. जी जी मोहन व्ही.एस. या कार्यक्रमात वक्ते म्हणून उपस्थित राहतील. या परिसंवादात शिक्षणतज्ज्ञ, कायदेशीर व्यावसायिक, वकील, कायद्याचे विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत.

## शिक्षक महोत्सव स्पर्धेत पिरकोन विद्यालयाच्या शिक्षकांचे सुयश



**उरण : वार्ताहर**

लाइफ ऑफ लाईट या संस्थेच्या शिक्षक महोत्सव स्पर्धेत कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन विद्यालयातील शिक्षकांनी चांगली कामगिरी केली आहे.

लाइफ ऑफ लाईट या संस्थेच्या माध्यमातून समाजामध्ये गरीब, वंचित घटकांसाठी अनेक समाजोपयोगी कार्यक्रम राबवून या घटकांना विकासाचा प्रकाश दाखवण्याचे कार्य केले जात आहे. अशावेळी या संस्थेच्या मार्फत शालेय विद्यार्थ्यांना इंग्रजी व गणितीय संकल्पनांचे सर्वसाधारण ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून त्यांच्या प्रतिनिधी मार्फत विद्यालयात अनेक नाविन्यपूर्ण, ज्ञानवर्धित करणारे उपक्रम वर्षभर राबविले जातात. अशा या राष्ट्रीय स्तरावरील उपक्रमशील संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये देशातील शिक्षकांना प्रेरित करण्यासाठी शिक्षक महोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये १००० पेक्षा अधिक उपक्रमशील शिक्षकांनी सहभाग नोंदविला होता.

या स्पर्धांमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पिरकोन विद्यालयातील उपक्रमशील विद्यार्थी प्रिय शिक्षक श्रपुरण मधुकर पाटील यांना माझी लेखणी माझे विचार' या स्पर्धेत समाज परिवर्तनात शिक्षकाची भूमिका'या विचारप्रवर्तक निबंधांसाठी राष्ट्रीयस्तरावर द्वितीय क्रमांक' प्राप्त झाला. त्याचबरोबर विद्यालयातील कलाप्रवण शिक्षिका नम्रता बाबुराव कल्याणकर' यांना कबाड से जुगाड' या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला.

या दोन्ही शिक्षकांनी घवघवीत यश प्राप्त करून विद्यालयाचे नाव उज्वल केले आहे. या पारितोषिक विजेत्या गुणी शिक्षकांचे विद्यालयाच्या स्कूल कमिटीचे चेअरमन जीवन गावंड व स्थानिक स्कूल कमिटी सदस्य व ज्येष्ठ साहित्यिक ए. डी. पाटील, दहागाव विद्यार्थी संघाचे अध्यक्ष कृष्णा पाटील, उपाध्यक्ष मुकुंद गावंड, पिरकोन ग्रामपंचायतच्या सरपंचा कलावती पाटील, विद्यालयाच्या कृतिशील प्राचार्या बल्लाळ मॅडम तसेच विद्यालयातील सर्व सहकारी शिक्षकांनी अभिनंदन केले. समाजातील सर्वस्तरातून या यशप्राप्तीबद्दल विद्यालयावर व पारितोषिक विजेत्या शिक्षकांवर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## बेलापुर विभागात पालिकेची अतिक्रमणविरोधी कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील बेलापूर विभागा अंतर्गत घर क्र. ०१३८/०००२, करावे गांव, से.३६, बेलापूर नवी मुंबई, यांना तसेच बर्गर किंग, प्लॉट नं-६९, शॉप नं- १५/१६, से-१५, साई सागर को.ऑ.हौ.सो, बेलापूर, नवी मुंबई यांना अन्वये अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविने आवश्यक होते, परंतु त्यांनी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवले होते.

अनधिकृत बांधकामावर अे विभाग बेलापूर कार्यालयामार्फत तोडक मोहिमेचे आयोजन करून या अनधिकृत बांधकामावर निष्कासित कारवाई करण्यात आली आहे. या धडक मोहिमेसाठी बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ. अमोल पालवे, कनिष्ठ अभियंता आत्काराम काळे व इतर अधिकारी अथवा कर्मचारी, मजूर दहा, हॅमर दोन, गॅसकटर दोन, तसेच अतिक्रमण विभागाकडील पोलीस तैनात होते. यापुढेदेखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## धवलारीण महिलांचा उरणमध्ये जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

आगरी, कोळी आणि कराडी या जातीमध्ये लग्न विधीत हळद आणि देवादिकांच्या विधी करण्याचे काम करणाऱ्या ज्या महिला जी गाणी गातात त्याला धवला आणि तो गाणारनींना धवलारीण असे म्हणतात. त्या वृद्ध स्त्रियांना उरणमध्ये जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

हा सत्कार दर महिन्याच्या १७ तारखेला होणाऱ्या विमला तलाव उरण येथील मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ कवी संजीव पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लेखिका शर्मिला गावंड, संपदा पाटील इत्यादींनी केला.

विमला तलाव मधुबन कट्ट्यावर ज्येष्ठ नागरिक आणि रसिकांना कविसंमेलन आणि विविध उपक्रमातून आनंद देण्यासाठी कोमसाप अध्यक्ष मच्छिंद्र म्हात्रे आणि मधुबन कट्टा अध्यक्ष रामचंद्र म्हात्रे, उरण कोमसाप,



रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रयत्न करत असतात.

या वेळी २७ बालकवींना कविसंमेलनातून रसिकांपुढे आणले तसेच तालुक्यातील करंजा येथील अनुबाई पांडुरंग ठाकूर, केळवणे येथील चंद्राबाई गणपत पटील आणि कुंडेगावच्या कुसुम काशिनाथ पाटील या तीन वृध्द धवलारीणींना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या वेळी धवलारीणींनी धवला गाऊन श्रोत्यांना आगळा वेगळा आनंद दिला. बालकवी अनुज शिवकर याने शिव गौरव गीत गाऊन रसिक प्रेषकांना प्रसन्न केले. अनामिका राम

या बालकवयित्रीने आणि अन्य बालकवींनी आपल्या स्वरचित कवितेने सर्वांना भारावून टाकले. उपक्रमांची वारीच्या गुणी शिक्षिका असलेल्या लेखिकेला आणि मेहनती शिक्षिका शर्मिला गावंड यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले तसेच दोहे लिहिणाऱ्या न.ग.पाटील यांना रायगडभूषण प्रा.एल.बी. पाटील यांच्या हस्ते गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजना जोशी यांनी केली. म.का.म्हात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : सुधीर नाझरे)



मुरूड : समुद्रकिनारी होळीनंतर कोळी बांधव पुन्हा मासेमारीसाठी सज्ज झाले आहेत. मासे काढण्यासाठी लागणारी जाळी बोटीमध्ये भरण्याचे काम सुरू आहे.

## कोपरखैरणे व बेलापूर विभागात अतिक्रमण विभागाची धडक कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत अतिक्रमण विभागाने कोपरखैरणे व बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कोपरखैरणे विभागा अंतर्गत नामदेव भीमराव चव्हाण. रूम नंबर २६९, सेक्टर ८, कोपरखैरणे यांना नोटीस देऊन बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे. रघुनाथ आनंदात थोरात. रूम नंबर २७०, सेक्टर ८, कोपरखैरणे यांच्या बांधकामावर निस्कासनाची कार्यवाही करण्यात आली. ३. रूम नंबर ७६२, सेक्टर १६, कोपरखैरणे, नवी मुंबई. रूम समोरील अनाधिकृत कट्टा तोडण्यात आला आहे.



यश बेलापुर विभागातील चंद्रकांत एकनाथ जाधव, घर क्र. ०१३८/०००२, करावे गांव, से.३६, फयाज अहमद /बर्गर किंग, प्लॉट नं-६९, शॉप नं- १५/१६, से-१५, साई सागर को.ऑ.हौ.सो, येथील अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली.

# अलिबागेत दुभाजकांची लांबी कमी करण्याचे काम

## अलिबाग आगारासमोरील वाहतूक कोंडीतून सुटका होणार



**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग एसटीअसलेल्या मार्ग दुभाजकाची लांबी कमी करावी अशी मागणी गेली अनेक वर्षे अलिबागकर करत होते. ही मागणी पूर्ण झाली आहे. हे काम सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे बसस्थानकासमोर होणाऱ्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची सुटका होणार आहे.

अलिबाग एसटी बसस्थानकासमोर असलेल्या दुभाजकामुळे आगारातून बाहेर पडणाऱ्या बसेस वळवताना बसचालकांना मोठी कसरत करावी लागते. समोरच्या बाजूला जर एखादी दुचाकी उभी असेल तर वाहन पुढे सरकणेच मुश्किल होते. अनेकदा बाजारहाट करण्यासाठी आलेले किंवा हॉटेलमध्ये गेलेले नागरीक बाहेरच्या बाजूला आपली दुचाकी, चारचाकी उभी करून जातात. मग आगारातून बाहेर पडणारया बसला मुंबईच्या दिशेने वळवताना अडथळा येतो. एसटीबस मध्येच उभी राहिल्याने दोन्ही बाजूची वाहतूक ठप्प होवून वाहतूक कोंडी होत असते.

यासदंर्भात नागरीकांनी अनेकदा स्थानकासमोरील दुभाजकाची लांबी कमी करण्याबाबत प्रशासनाला सुचवले होते. परंतु त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. मागील महिन्यात बसस्थानकासमोर झालेल्या अपघातात एका तरूण दुचाकी स्वाराचा दोन बसमध्ये चिरडून मृत्यू झाला होता. त्यानंतर बसस्थानकासमोर होणारया वाहतूक कोंडीचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला.

त्यानंतर परशुराम हिंदू सेवा संघाने यात पुढाकार घेतला. वाहतूक कोंडीची समस्या कमी करण्यासाठी बससथानकासमोरील दुभाजकाची लांबी कमी करावी, अशी मागणी त्यांनी केली. जिल्हाध्यक्ष अभिजीत दातार यांचया नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी यांना निवेदनदेखील दिले. त्यानंतर जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी संघटनेचे पदाधिकारी आणि सर्व संबंधित अधिकारी यांची बैठक बोलावून उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार आता बससथानकासमोरील दुभाजकाची लांबी कमी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

बससथानकापासून अवघ्या ५० मीटर अंतरावर पीएनपी इमारती समोर अडलेल्या मार्ग दुभाजकामुळे वाहतूकीला अडथळा येतो. मुरूडकडून येणारी मोठी वाहने वळववताना वाहनचालकांना कसरत करावी लागते. आणि वाहतूक कोंडी होत असते. हे लक्षात घेवून तेथील दुभाजकाची देखील लांबी करण्याचे काम सुरू झाले आहे.

# काळ जलविद्युत प्रकल्पाच्या गोदामाला भीषण आग

## मशिनरींच्या स्फोटामुळे रायगड परिसर हादरला



**महाड : प्रतिनिधी**

महाड-रायगड मार्गावर कोंझर या गावानजिक असलेल्या काळ जलविद्युत प्रकल्पाच्या गोदामाला आज दुपारी भीषण आग लागली. आगीनंतर गोदामातील मशिनरींचे स्फोट झाल्याने, रायगड किल्ल्याचा परिसर हादरून गेला होता.

काळ जलविद्युत प्रकल्पाचे हे गोदाम पत्र्याची शेड टाकून तयार करण्यात आले आहे. गोदामामध्ये वीज निर्मितीसाठी वापरण्यात येणारी टर्बाइन आणि अन्य मशिनरी ठेवण्यात आली होती. या गोदामाच्या परिसरात लागलेल्या वणव्याची आग या शेडपर्यंत पोहोचली आणि क्षणार्धात गोदामाने पेट घेतला. त्यानंतर गोदामातील मशिनरीचे तीन मोठे स्फोट देखील झाले. त्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली होती.

या आगीची माहिती मिळाल्यानंतर महाड नगर पालिका आणि महाड एमआयडीसी अग्निशमन दलांनी घटनास्थळी धाव घेत आग अटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत मोठे नुकसान होवून गेले होते. वणवा लागलेला असताना तो गोदामापर्यंत पोहोचू नये याची दक्षता का घेण्यात आली नाही असा प्रश्न या घटनेनंतर उपस्थित झाला आहे.

# कातकरी समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा गौरव



**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संस्थेतर्फे दिघेवाडी आदिवासीवाडी येथे नुकतेच कातकरी समाजातील सुशिक्षित व विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमास प्राथमिक शिक्षिका काळे मॅडम, माजी सरपंच संजना वाघमारे, अंगणवाडी सेविका व मदतनीस संचिता पवार, सुषमा पवार आणि मयुरी पवार यांची प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन अनोख्या पद्धतीने करण्यात आले. महिलास्वरूप पाने गळलेल्या झाडाला शिक्षण, समानता, संधी, पाठिंबा, विश्वास, आदर अशा गोष्टी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पानांच्या रूपाने देवून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी आयोजित परिसंवादामध्ये महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संस्थेच्या प्रकल्प सहाय्यक ममता रावते यांनी प्रमुख पाहुण्यांशी संवाद साधत त्यांना बोलते केले. संविधान अभ्यासक व अंगणवाडी मदतनिस सुषमा पवार यांनी महिलांसाठी असलेल्या योजना व कायदे याची माहिती सांगून अतिशय ओघवत्या शैलीत कविता व ऐतिहासिक दाखले देत उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. संचिता पवार यांनी आई-बाबांप्रमाणेच सासू-सासऱ्यांनीदेखील शिक्षण व कामात दिलेला पाठिंबा सांगून महिलांना पुढे जाण्यासाठी फक्त विश्वासाची गरज असल्याचे सांगितले. प्राथमिक शिक्षिका काळे मॅडम यांनी देखील शिक्षकांच्या आर्थिक पाठिंब्याने पूर्ण झालेले शिक्षण व आता नोकरी करताना नवऱ्याने दिलेला पाठिंबा कसा महत्त्वाचा आहे हे सांगून महिलांच्या सद्यस्थितीबाबत मांडणी केली.

प्रकल्प समन्वयक सतीश शिर्के यांनी उपस्थित महिलांशी संवाद साधताना महिलेच्या पायात कोणत्या प्रकारच्या बेड्या आहेत नि त्या कशा पद्धतीने तोडून, आवश्यक तिथे बंड करून, सहकारी पुरुषाला सोबत घेऊन पुढे जायला हवे हे गाण्याच्या माध्यमातून सांगितले.

हा कार्यक्रम प्रभावी होण्यासाठी महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ संस्थेच्या प्रेरणा सखी रोशनी वाघमारे, समीरा जाधव, प्रकल्प सहाय्यक ममता रावते, विलास भुसारे आणि सिद्धेश आडकर यांनी उत्तम नियोजन केले. सोबतच दिघेवाडी आदिवासीवाडी ग्रामस्थ व महिला मंडळ यांचे विशेष सहकार्य मिळाले.

# लव्हेज ग्रामस्थांचे विविध मागण्यांचे आमदार महेंद्र थोरवे यांना निवेदन



**खोपोली: प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज गाव व परिसरातील ग्रामस्थांनी आपल्या विविध समस्यांबाबत सोमवारी आमदार महेंद्र थोरवे यांना निवेदन देऊन त्याबाबत लक्ष घालण्याचे विनंती केली, आमदार थोरवे यांनी निवेदन स्वीकारून त्या समस्या सोडवण्याचे शब्द दिला.

प्रामुख्याने ग्रामस्थांच्या २० एकर जागेवर नियोजित डम्पिंग ग्राउंड रद्द करण्यात यावा, येथील शेतकऱ्यांची स्टेडियम साठी जागा आरक्षित केली आहे, ती ५० वर्ष जागा वापरण्यात आली नाही ती जागा शेतकऱ्यांना परत द्यावी, ग्रीन झोन उठवण्यात यावा, लव्हेज, वासरंग चिंचवली हा रहदारीचा रस्ता पूर्वीप्रमाणे २४ मीटर ऐवजी १८ मीटर करण्यात यावा, तसेच गावाची संभाव्य वाढती लोकसंख्या पाहता रेल्वे क्रॉसिंग व्यापक करण्यात याव, किंवा रेल्वे ओवरब्रिज करण्यात यावा अशा विविध मागण्यांचे निवेदन ग्रामस्थांतर्फे आमदार थोरवे यांना देण्यात आले आहे. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख संदीप पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख पंकज पाटील, दिनेश पाटील व अनेक शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

राम प्रहर
वस्तुनिष्ठ बातम्या आणि
आकर्षक जाहिरातींसाठी

Hiring
Audit Staff
Fresh/ Experienced
Audit staff required
for CA firm
at Hiranandani fortune city ,
Apollo 206, sector A, Garden enclave,
Bhokarpada , Panvel
Contact:
8390407010

## सार्वजनिक सूचना

सर्वसामान्य नागरिकांना सूचित करण्यात येते की, माझे अशील भूखंड मालक **१) श्री. अनिल चांगा केणी २) श्री. धाया आंबो केणी ३) श्री. सुरज धाया केणी** सर्व रा. प्लॉट नं. १०३, एलीजन आयगोना, सेक्टर २अ, करंजाडे, ता. पनवेल, जि. रायगड यांनी **१२ सप्टेंबर २०२१** रोजी विकासक मे. एस. के. कन्स्ट्रक्शन तर्फे **श्री. सुधीर मल्हारी कोळी** पत्ता: ३४, मारुती पॅराडाईज सी.एच.एस., प्लॉट नं. ९२ ते ९५, सेक्टर १५, बेलापुर, नवी मुंबई ४००६१४ यांच्यासोबत केलेला भूखंड

**भुखंडाचे वर्णन**

| नोड | सेक्टर | भुखंड क्रमांक | क्षेत्र |
|---|---|---|---|
| पुष्पक (वडघर), ता. पनवेल, जि. रायगड | आर-३ | ९९ | ५४० चौ.मी. |

संदर्भातील **भुखंड विकसनाचा सामंजस्य करार रद्द केला आहे.**

सदर करार रद्द करण्याचे कारण म्हणजे विकासक मे. एस. के. कन्स्ट्रक्शन तर्फे श्री. सुधीर मल्हारी कोळी यांनी करारात नमूद अटी व शर्ती पूर्ण करण्यात अपयश केले आहे. यासंदर्भात दिनांकः ३०/११/२०२४ रोजी कायदेशीर नोटीस पाठवून विकासकास कळविण्यात आले होते, परंतु त्यांनी त्यास उत्तर देवून मागणी नाकारली आणि कोणतीही कारवाई केली नाही तसेच, सदर कराराचा कालावधी दि.१२/०३/२०२५ रोजी संपलेला आहे त्यामुळे सदर करार रद्द करण्यात आला आहे याबाबतची दि.१३/०३/२०२५ रोजीची समज नोटीस विकासकास देण्यात आलेली आहे. वरील परिस्थितीच्या आधारे, सदर करार रद्द करण्यात आला आहे. भूखंड मालकांच्या वतीने जाहीर केले जाते की, संबंधित भूखंडाबाबत विकासक मे. एस. के. कन्स्ट्रक्शन तर्फे श्री. सुधीर मल्हारी कोळी यांच्यासोबत कोणत्याही व्यवहारांसाठी माझे अशील भूखंड मालक जबाबदार राहणार नाहीत.

सर्वसामान्य नागरिकांना विनंती आहे की, संबंधित भूखंडाविषयी विकासक मे. एस. के. कन्स्ट्रक्शन तर्फे श्री. सुधीर मल्हारी कोळी यांच्यासोबत कोणत्याही व्यवहारात सहभागी होऊ नये, कारण सदर करार रद्द करण्यात आला आहे.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक: २१/०३/२०२५**

**सही/-**
**ॲड. राहुल दत्तात्रेय मोकल**
मु. पो. पारगाव, ता. पनवेल,
जि. रायगड, ४१०२०६

टीप: ही सार्वजनिक सूचना भूखंड मालकांच्या कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्याच्या हेतूने प्रसिद्ध करण्यात आली आहे.

# जिल्हास्तरावरील स्थानिक तक्रार समितीची पुर्नगठीत करण्यासाठी इच्छुकांनी अर्ज करण्याचे आवाहन

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अन्वये जिल्हास्तरावर स्थानिक तक्रार निवारण समिती पुर्नगठित करण्यात येणार आहे. तरी पात्रताधारक इच्छुकांनी दि.२७ मार्च २०२५ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व ३ सदस्य यांची नियुक्ती करण्यात येणार आहे. या पदासाठी खालीलप्रमाणे निकष आहेत. अध्यक्ष पदासाठी-सामाजिक कार्याचा पाच वर्षाचा अनुभव आणि महिलांच्या हिताशी बांधिलकी असलेली मान्यवर महिला अर्ज करण्यासाठी पात्र आहे.

एक सदस्य-जिल्ह्यातील गट, तालुका, तहसिल, प्रभाग, नगरपालिका या पातळीवर कार्यालयामध्ये काम करणाऱ्या महिला तर दोन सदस्य-महिलांच्या हितासाठी बांधिल असलेल्या संस्था, संघटना मधील महिला किंवा पुरूष व्यक्ती जिला कायद्याचे ज्ञान असेल यापैकी एक सदस्य अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी. समाजिक कायद्याचे ज्ञान असलेली महिला.

या समितीमधील निवड झालेले अध्यक्ष व सदस्य यांच्या नियुक्तीचा कालावधी ३ वर्षाचा राहिल. या समितीचे अध्यक्ष व सदस्य यांनी गैरवर्तन केल्यास समितीतून काढले जाईल. यामध्ये कलम १६ चे उल्लंघन केल्यास, एखाद्या गुन्ह्याची शिक्षा झाल्यास किंवा कोणत्याही कायद्याखाली गुन्ह्याची चौकशी चालु असल्यास.शिस्त भंगाची कारवाई झाल्यास किंवा शिस्त भंगाबाबत चौकशी चालू असल्यास अथवा पदाचा गैरवापर केल्यास पद रद्द करण्यात येईल.

सदर नामनिर्देशन करीता अर्जदाराचे नाव, पत्ता व संपर्क क्रमांक, समितीतील पद, शैक्षणिक पात्रता, अनुभव, आधारकार्ड इ. संपूर्ण कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव दीप महल बंगला, दुसरा मजला, स्वामी समर्थ नगर, पिंपळभाट-चेंढरे, रायगड-अलिबाग या कार्यालयास २७ मार्च रोजी सायं. ६.वाजेपर्यंत सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.

# रुद्रवली शाळेचा सन्मान



**माणगाव : प्रतिनिधी**

संपर्क फाउंडेशनच्या वतीने २०२४ या वर्षाच्या स्टार स्टुडन्ट व स्टार टीचर्स पुरस्काराने रुद्रवली शाळेला सन्मानित करण्यात आले.

संपर्क फाउंडेशन ही संस्था रायगड जिल्ह्यामध्ये डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण व मार्गदर्शन करण्याचे आणि शिक्षकांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करत आहे. त्यानी विकसित केलेल्या संपर्क स्मार्ट शाळा ॲपद्वारे रायगड जिल्ह्यातून रुद्रवली शाळेची विद्यार्थिनी आराध्या किरण महाडकर स्टार स्टुडन्ट म्हणून तर शाळेचे शिक्षक अमोल गजानन गुरव यांची स्टार शिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत खाली नमूद केलेल्या इसमांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे व तसे खरेदीखत ही त्यांचेबरोबर केलेला आहे.

तरी सदरहू मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा, कब्जा, इजमेन्ट, साठेकरार, फरोक्त, खरेदीखत, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अटॅचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासून **७ दिवसाच्या** आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरुप विषेद करुन कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. अगर समक्ष येवून भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांबर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल यांची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे - मोर्बे, ता -पनवेल, जि-रायगड**

| सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पै | मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| २२५ | ३ | ०-२०-००<br>पो.ख. ०-००-००<br>एकूण ०-२०-०० | १.७१ | सौ. अलका रामभाऊ म्हात्रे |

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/०३/२०२५**

**सही/-**
**ॲड. जयवंत एकनाथ भोपी**
**ॲडव्होकेट**
शॉप नं. १३, वरद विनायक कॉम्प्लेक्स,
प्लॉट नंबर ३, सेक्टर नंबर ५, गुरूद्वारा समोर,
नवीन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे - मोर्बे, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तिच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

**- मिळकतीचे वर्णन-**
**मौजे - मोर्बे, ता -पनवेल, जि-रायगड**

| मौजे | भोगवटदाराचे नाव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र हे. आर. पॉ | आकार रु.पै |
|---|---|---|---|---|---|
| मोर्बे | वालकू काथोर पालकर | ७६ | ४ | ०.०६.६० | ०.१२ |
| | | १९ | २ | ०.१७.४० | १.९४ |
| | | ३५ | - | ०.०३.०० | ०.०६ |

सदरहू जागा, जमिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक : २०/०३/२०२५**

**सही/-**
**ॲड. सुरेखा र. सागावकर**
पत्ता- शॉप नं. ०३,०४, श्री हरेकृष्णा को. ऑप. सोसायटी, प्लॉट नं. १२, प्लॉट नं. ५,
सेक्टर-५, नवीन पनवेल, ४१०२०६

# 'माझा गाव माझा खोपोली' पुस्तकाचे प्रकाशन



**खोपोली : प्रतिनिधी**

ज्येष्ठ विधीज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या मीना बाम यांनी लिहिलेल्या व खोपोलीच्या ऐतिहासिक, सामाजिक, साहित्यिक व अध्यात्मिक वारसा यांच्यावर प्रकाशझोत टाकणाऱ्या हा पहा माझा गाव खोपोली या पुस्तकाचे प्रकाशन चिन्मय मिशन या संस्थेचे निवासी आचार्य स्वामी मेधजानंद यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी लोहाणा सभागृहात झाले.

या वेळी माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, व्हिडिएम स्कूलचे अध्यक्ष उल्हास देशमुख, कोमसाप अध्यक्षा उज्वला दिघे, युद्धवीर प्रकाश महाडिक, सुनील भालेराव, अशोक पाटणकरे, मीना बाम, श्रीनिवास कुंटे, दीपक कुंभार इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

स्वामी मेधजानंद यांनी इतिहासामधून आपल्याला अनेक गोष्टी शिकता येतात. त्यामुळे प्रत्येक गोष्टीचा इतिहास हा महत्त्वाचा आहे. बाम यांनी लिहिलेला खोपोलीचा इतिहास हा अनेकांना मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. मीना बाम यांनी प्रास्ताविकामध्ये पुस्तक लिखाणा मागची कल्पना उलगडून सांगितली. त्यानंतर मान्यवरांची समयोचित भाषणे झाली. काहींनी आपली मनोगते व्यक्त केली.

बाम यांनी खोपोलीच्या जडणघडणीचा विस्तृत अभ्यास करून, ऐतिहासिक संदर्भ, पुरावे आणि समकालीन व्यक्तींच्या भेटीगाठींवर आधारित हे अभ्यासपूर्ण पुस्तक साकारले आहे. इतिहासाचा ठेवा जतन करणारे पुस्तक खोपोलीकरांसाठी तसेच अभ्यासकांसाठी एक अमूल्य ठेवा ठरणार असल्याच्या भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या. दीपक बाम यांनी मान्यवरांचे स्वागत केले. प्रसन्न बाम यांनी शेवटी आभार मानले.

# मुंबईपाठोपाठ राजस्थान रॉयल्सनेही कर्णधार बदलला

## संजू सॅमसनच्या जागी रियान पराग

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५ चा हंगाम २२ मार्चपासून सुरु होणार आहे. मात्र त्याआधी राजस्थान रॉयल्सने मोठा निर्णय घेतला आहे. आयपीएल २०२५ च्या आधी राजस्थान रॉयल्सने संघात मोठा बदल केला आहे. रियान परागला कर्णधार बनवण्याचा निर्णय राजस्थान रॉयल्सने घेतला आहे. राजस्थानने इन्स्टाग्रामवर याबाबत एक पोस्टही शेअर केली आहे. दरम्यान मुंबई इंडियन्सने देखील पहिल्या सामन्यासाठी सूर्यकुमार यादवकडे नेतृत्व दिले आहे. त्यानंतर नेहमीप्रमाणे हार्दिक पांड्या मुंबई इंडियन्सचे सूत्रे सांभाळेल.

राजस्थान रॉयल्सने पहिल्या तीन सामन्यांसाठी रियान परागकडे कर्णधारपद देण्यात आले आहे. या तीन सामन्यात संजू सॅमसन संघात फक्त फलंदाज म्हणून खेळेल. गेल्या काही आठवड्यांपासून बोटाच्या दुखापतीने त्रस्त असलेला संजू सॅमसन अद्याप त्यातून पूर्णपणे



बरा झालेला नाही. बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्सकडून संजू सॅमसनला फलंदाजीची परवानगी मिळाली आहे पण विकेटकीपिंगसाठी अद्याप हिरवा कंदील मिळालेला नाही. त्यामुळे राजस्थानच्या व्यवस्थापनाने रियान परागला पहिल्या तीन सामन्यांचे नेतृत्व देण्याचे ठरवले आहे.

पहिल्या तीन सामन्यांसाठी रायनला कर्णधारपद मिळाले आहे. राजस्थान रॉयल्स संघाचा पहिला सामना हैदराबादशी आहे. हा सामना २३ मार्च रोजी खेळवला जाईल. यानंतर, राजस्थानचा दुसरा सामना कोलकाता नाईट रायडर्सशी आहे. हा सामना २६ मार्च रोजी गुवाहाटी येथे खेळला जाईल. तिसरा सामना चेन्नई सुपर किंग्जशी आहे. हा सामना ३० मार्च रोजी खेळला जाईल.

आयपीएलच्या २०२५ च्या हंगामातील पहिला सामना मुंबई इंडियन्सचा कर्णधार हार्दिक पांड्याला खेळता येणार नाही. त्यामुळे एका सामन्यासाठी मुंबई इंडियन्सचे कर्णधार सुर्यकुमार यादव सांभाळताना दिसताना दिसेल. आयपीएल २०२४च्या मुंबई इंडियन्सच्या शेवटच्या लीग सामन्यानंतर हार्दिक पांड्यावर वर एका सामन्याची बंदी घालण्यात आली होती. एमआय संघ प्लेऑफसाठी पात्र ठरू शकला नसल्याने आयपीएल २०२५ च्या हंगामापर्यंत बंदी कायम राहील. अशा परिस्थितीत हार्दिक पांड्या चेन्नईविरुद्ध संघाचा पहिला सामना खेळू शकणार नाही. हार्दिकला आयपीएल २०२४ मध्ये तीन ओव्हर-रेट गुन्ह्यांसाठी दंड ठोठावण्यात आला होता. लीगच्या नियमांनुसार, जेव्हा एखादा संघ एका हंगामात तीन वेळा आवश्यक ओव्हर-रेट राखण्यात अपयशी ठरतो, तेव्हा कर्णधारावर एका सामन्याची बंदी घातली जाते.

# छोटा पॅक बडा धमाका!

## आयपीएलमध्ये पाच अनकॅप्ड खेळाडू ठरू शकतात लक्षवेधी



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या यंदाच्या १८व्या हंगामात पाच अनकॅप्ड प्लेयर्स असे आहेत, जे छोटा पॅक बडा धमाका अशी झलक दाखवून देऊ शकतात.

राजस्थान रॉयल्सच्या ताफ्यातील वैभव सूर्यवंशी हा खेळाडू मेगा लिलावापासून चर्चेत आहे. १३ वर्षीय खेळाडूसाठी राजस्थानच्या संघाने १.१० कोटी रुपये मोजले आहेत. त्याला किती सामन्यात संधी मिळणार अन् तो कशी कामगिरी करणार ते पाहण्याजोगे असेल.

चेन्नई सुपर किंग्सच्या ताफ्यातील आंद्र सिद्धार्थ हादेखील एक प्रतिभावंत खेळाडू आहे. तामिळनाडूच्या या खेळाडूसाठी चेन्नईच्या संघाने ३० लाख रुपये मोजले आहेत.

मुंबईकर सूर्यांश शेडगे हा पंजाब किंग्सच्या ताफ्यातून खेळताना दिसणार आहे. अखेरच्या षटकात तुफान फटकेबाजी करण्याची क्षमता असलेला हा खेळाडू श्रेयस अय्यरच्या कॅप्टन्सीत खेळणार असल्यामुळे त्याला अधिकाधिक संधी मिळेल, अशी अपेक्षा आहे.

रांचीचा रॉबिन मिंझ हा एक विकेटकिपर बॅटर आहे. यंदाच्या हंगामात तो मुंबई इंडियन्सच्या ताफ्यातून धमाका करताना पहायला मिळेल. ईशान किशनची तो एक परफेक्ट रिप्लेसमेंट ठरू शकतो. रॉबिन मिंझ हा एक विकेटकिपर बॅटर आहेच, शिवाय त्याच्या फलंदाजीत धोनीची झलकही दिसून येते. लिलावात कुणी घेतले नाही तर मी रॉबिनला चेन्नईत घेईन, असा शब्द धोनीने या युवा क्रिकेटरच्या वडिलांना दिला होता. आता तो धोनीविरुद्ध खेळताना दिसेल.

न्यूझीलंडचा युवा क्रिकेटर बेवॉक जेकॉब्स हा मुंबई इंडियन्सच्या ताफ्यात असून तोही धमाकेदार खेळी करण्यात माहिर आहे. त्याला किती सामन्यात संधी मिळणार तेही पाहण्याजोगे असेल.

# अडीच महिन्यांत सर्व बदलले -हार्दिक पांड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघातील अष्टपैलू खेळाडू हार्दिक पांड्या आता आयपीएल हंगामासाठी सज्ज आहे. यंदाच्या हंगामातील पहिल्या सामन्याला तो मुकणार असला तरी त्यानंतर तोच या संघाचे नेतृत्व करताना दिसणार आहे. माझ्या बाबतीत फक्त अडीच महिन्यात सर्व बदलले, असे सांगत त्याने वाईट काळातून सावरल्याची गोष्ट शेअर केली आहे.

गुजरातच्या संघाला चॅम्पियन केल्यावर हार्दिक पांड्याने मुंबई इंडियन्सच्या संघात घरवापसी केली. गत हंगामात मुंबई इंडियन्सच्या संघात रोहितची जागा घेत कर्णधार झाल्यावर तो तुफान ट्रोल झाला. एवढेच नाही तर त्याच्या वैयक्तिक आयुष्यातही वादळ आले. ज्या नताशासोबत दोन वेळा लग्न केले तिच्यासोबतचा संसार मोडला.

हे सगळे घडल्यावरही हार्दिक पांड्या ढळला नाही. वेळ फिरली, पण त्याने हिंमत नाही हारली. आजूबाजूला नकारात्मक



गोष्टी घडत असताना हार्दिक पांड्याला सावरण्यासाठी फक्त एक गोष्ट पुरेशी ठरली. खुद्द हार्दिकनेच एका मुलाखतीमध्ये या संदर्भातील माहिती दिली.

जिद्द, प्रामाणिक प्रयत्न आणि सर्वोच्च कामगिरीसह सर्व ठीक होईल, असे वाटत होते, पण पुढे काय होईल याची कल्पना नव्हती. सातत्याने मेहनत घेत राहिलो. कठोर परिश्रमाचे फळ मिळाले. टी-२० वर्ल्डकप जिंकला अन् पुन्हा सगळे अगदी ३६० अंश डिग्रीमध्ये फिरले, असेही हार्दिकने सांगितले.

### क्रिकेट हाच खरा मित्र!

आयपीएलच्या यंदाच्या हंगामाआधी हार्दिक पांड्याची एक मुलाखत चर्चेत आहे. ज्यात त्याने प्रबळ इच्छाशक्ती आणि स्वत:ला मजबूत ठेवण्यासाठी काय केले ते सांगितले आहे. तो म्हणाला आहे की, मी कधीही मैदानात सोडण्याचा विचार मनात आणत नाही. ही गोष्ट मला अधिक मजबूत करते. आजूबाजूला काहीही घडू देत क्रिकेट हाच खरा मित्र आहे ते विसरत नाही, कारण हीच गोष्ट मला पुढे घेऊन जाणार आहे. अशा आशयाच्या शब्दांत हार्दिकने क्रिकेटला आयुष्यात महत्त्वाचे स्थान असल्याचे सांगितले आहे.

# विराटचा वर्ल्डकप विजेता सहकारी करणार आयपीलीएलमध्ये पंचगिरी

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२५चा सीझन येत्या दोन दिवसांत सुरू होणार आहे. पहिला सामना आरसीबी आणि केकेआर यांच्यात २२ मार्चला होणार आहे. विराट कोहलीचा संघ आयपीएलच्या पहिल्याच सामन्यात खेळताना दिसणार आहे. दरम्यान, विराटचा अंडर-१९ संघातील सहकारी खेळाडू आता आयपीएलमध्ये अंपायरिंग करताना दिसणार आहे.

सन २००८मध्ये भारताच्या अंडर-१९ संघाने विश्वचषक जिंकल्यानंतर विराट कोहली प्रसिद्धीच्या झोतात आला. विराटव्यतिरिक्त, रवींद्र जडेजा आणि मनीष पांडे हेदेखील विजयी संघाचा भाग होते,





जे अजूनही सक्रिय खेळाडू आहेत, पण भारताला अंडर-१९ विश्वचषक जिंकून देण्यात सर्वात मोठी भूमिका तन्मय श्रीवास्तवची होती, ज्याने टूर्नामेंटमध्ये सर्वाधिक २६२ धावा केल्या होत्या. इतकेच नव्हे तर अंतिम सामन्यात त्याने महत्त्वपूर्ण ४३ धावांची खेळी केली होती.

या कामगिरीनंतरही तन्मयला भारतीय संघात खेळण्याची संधी मिळाली नाही, पण त्याला आयपीएल २००८ आणि २००९मध्ये पंजाब किंग्ज (तेव्हाचे किंग्ज इलेव्हन पंजाब) सोबत काही सामने खेळण्याची संधी मिळाली. हा डावखुरा फलंदाज २०२०मध्ये वयाच्या ३०व्या वर्षी निवृत्त झाला.

व्यावसायिक क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर तन्मयने अंपायरिंगला सुरुवात केली आणि आता बीसीसीआयचा क्वालिफाई पंच बनल्यावर तो आयपीएल २०२५मध्ये अधिकारी म्हणून पदार्पण करण्यासाठी सज्ज झाला आहे. यासह तो आयपीएलमध्ये खेळणारा आणि अंपायरिंग करणारा पहिला व्यक्ती बनणार आहे.

३५ वर्षीय तन्मय उत्तर प्रदेश क्रिकेट संघाकडून देशांतर्गत क्रिकेट खेळत असे. तो आयपीएल २०२५मध्ये पंचांच्या भूमिकेत दिसणार असल्याची माहिती उत्तर प्रदेश क्रिकेटने फोटो पोस्ट करत दिली आहे.

# आजपासून नवी मुंबई महानगरपालिका चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका क्रीडा व सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने २१ ते २३ मार्च २०२५ रोजी वाशीमध्ये 'नवी मुंबई महापालिका चषक राज्य अजिंक्यपद व्हॉलीबॉल स्पर्धा २०२४ – २५' चे आयोजन करण्यात आलेले असून या माध्यमातून राज्यातील नामांकित व्हॉलीबॉल संघ आपले कौशल्य प्रदर्शित करणार आहेत.

महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने व ठाणे जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशन आणि नवी मुंबई मॅच्युअर व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने तसेच कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी यांच्या सहयोगाने होणाऱ्या या ३ दिवसीय स्पर्धेत १६ पुरुष व ८ महिला संघांतील अत्यंत नामवंत व राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती असणाऱ्या खेळाडूंचा खेळ बघण्याची संधी नवी मुंबईकरांना प्राप्त होणार आहे.

या स्पर्धा शुक्रवार (दि.२१) पासून रविवार (दि.२३)पर्यंत कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय (मॉडर्न कॉलेज), वाशी येथे होणार असून स्पर्धेतील विजेत्या संघांना रोख पारितोषिक व स्मृतिचिन्ह तसेच वैयक्तिक सर्वोत्कृष्ट खेळाडूंनाही विशेष पारितोषिके व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेचा शुभारंभ शुक्रवारी, सायं. ६ वा. तसेच पारितोषिक वितरण समारंभ रविवारी सायं. ७ वा. होणार आहे. तरी नवी मुंबईमधील तमाम क्रीडाप्रेमी नागरिकांनी या स्पर्धांच्या निमित्ताने नवी मुंबईत येणाऱ्या नामवंत व्हॉलिबॉलपटूंचा खेळ बघण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# चहल-धनश्री वेगळे कोर्टाची घटस्फोटाला मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा स्टार क्रिकेटर युजवेंद्र चहल आणि यूट्यूबर/डान्सर धनश्री वर्मा यांच्या वैवाहिक जीवनाचा शेवट झाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर गुरुवारी (दि.२०) वांद्रे कौटुंबिक न्यायालयाने त्यांच्या घटस्फोटाला मंजुरी दिली. दोघे डिसेंबर २०२० मध्ये विवाहबद्ध झाले होते. आता दोघे कायदेशीररित्या वेगळे झाले आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून हे दोघे वेगळे राहत होते आणि त्यांनी परस्पर संमतीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला होता. सहा महिन्यांच्या अनिवार्य कूलिंग पीरियडला सूट मिळावी, अशी मागणीही त्यांनी केली होती. मात्र, कौटुंबिक न्यायालयाने ही मागणी फेटाळली होती. त्यानंतर उच्च न्यायालयाने हा निर्णय बदलून त्यांना ही सूट दिली आणि घटस्फोटाची प्रक्रिया जलद पूर्ण होण्याचा मार्ग मोकळा केला.

मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी चहल आणि धनश्री यांच्या सहमतीने झालेल्या घटस्फोटाला मंजुरी देताना ६ महिन्यांच्या कूलिंग पीरियडमधून सूट दिली. न्यायमूर्ती माधव जामदार यांच्या एकल खंडपीठाने सांगितले की चहल २१ मार्चपासून आयपीएलसाठी उपलब्ध राहणार असल्यामुळे घटस्फोटाची प्रक्रिया वेगाने पूर्ण करावी.




# रोहित शर्मा एक दिवस थेट निवृत्ती जाहीर करेल

### जुन्या मित्राचा दावा

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाला चॅम्पियन्स ट्रॉफी स्पर्धेत विक्रमी विजेतेपद मिळवून दिल्यावर कॅप्टन म्हणून रोहित शर्मा कसा योग्य अशा चर्चा ऐकू येऊ लागल्या आहेत. मी पुढेही खेळत राहणार आहे असे थेट रोहितनेच सांगून टाकले. याचदरम्यान, रोहितबरोबर क्रिकेट खेळलेला त्याचा जुना सहकारी मित्र सुदीप याने त्याच्या निवृत्तीबाबत मोठे विधान केले आहे.

रोहित शर्माला मी सुरुवातीपासून ओळखतो. तो कधीही गोंधळलेला नसतो. नेमके काय करायचे हे त्याच्या मनात ठरलेले असते. त्यामुळे त्याला निवृत्ती घ्यायची असेल तेव्हा तो कुणालाही विचारत बसणार नाही, कुणाचेही मत विचारत बसणार नाही. जेव्हा त्याला वाटेल की आता क्रिकेट खेळणे शक्य नाही, तेव्हा तो थेट निवृत्ती जाहीर करून टाकेल, असे रोहितचा सहकारी सुदीप त्यागी 'स्पोर्टकीडा'शी बोलताना म्हणाला. सुदीप हा भारतासाठी चार वनडे खेळला आहे.

सुदीप पुढे म्हणाला, रोहित शर्मा सध्या ज्यापद्धतीचे क्रिकेट खेळतोय, ते पाहता त्याने कर्णधार म्हणून आपली कारकीर्द सुरू ठेवावी असे मला वाटते. दोन आयसीसी ट्रॉफी जिंकून रोहितने टीकाकारांना उत्तर दिले आहे. भारतीय संघासाठी त्याने अनेक चांगल्या खेळी खेळल्या आहेत तसेच संघाला एकत्र ठेवण्यातही त्याचा मोठा वाटा आहे.

# पाकिस्तानी क्रिकेटरला आयसीसीचा दणका!

## दुसऱ्या खेळाडूशी गैरवर्तन केल्याने मोठा दंड

**दुबई : वृत्तसंस्था**

न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यात पाच सामन्यांची टी-२० आंतरराष्ट्रीय मालिका खेळली जात आहे. या मालिकेतील दुसऱ्या सामन्यापूर्वी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने म्हणजेच आयसीसीने पाकिस्तान संघाचा अष्टपैलू खेळाडू खुसदिल शाहवर मोठी कारवाई केली आहे. खुसदिल शाहने आयसीसी आचारसंहितेच्या लेव्हल २चे उल्लंघन केल्याचे आढळल्याने त्याला त्याच्या सामन्याच्या मानधनापैकी ५०टक्के दंड ठोठावण्यात आला आहे.

क्राइस्टचर्च येथे रविवारी न्यूझीलंड आणि पाकिस्तान यांच्यातील पहिल्या टी-२० सामन्यादरम्यान ही घटना घडली. खुसदिल शाहने खेळाडू आणि



सपोर्ट स्टाफसाठी असलेल्या आयसीसीच्या आचारसंहितेच्या कलम २.१२चे उल्लंघन केल्याचे आढळून आले. पाकिस्तानच्या डावाच्या आठव्या षटकात खुसदिल शाहने गोलंदाज झाचेरी फॉल्क्सच्या पाठीवर बॉल मारला, तेव्हा ही घटना घडली. खुसदिलने पंच आणि सामनाधिकारी जेफ क्रो यांनी लादलेली शिक्षा मान्य केली, ज्यामुळे औपचारिक सुनावणीची आवश्यकता भासली नाही.

दंडासोबतच खुसदिलच्या रेकॉर्डमध्ये तीन डिमेरिट पॉइंट्सदेखील जोडले गेले आहेत. २४ महिन्यांच्या कालावधीत हा पहिलाच गुन्हा होता. जर २४ महिन्यांच्या कालावधीत चार किंवा त्याहून अधिक डिमेरिट पॉइंट्स जमा झाले तर खेळाडूला एक कसोटी, दोन वनडे किंवा दोन टी-२० सामन्यांसाठी बंदी घालण्यात येते.



सौजन्य : श्री.आनंद ढवळे (अध्यक्ष पनवेल तालुका भाजपा युवा मोर्चा)

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com